रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८८ । अंक १११ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in




रायगड, गुरुवार, दि. १९ सप्टेंबर २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

**नारळाचीवाडी विकणे आहे**
अलिबाग- नागाव मेन रोडटच
निसर्गरम्य माऊंटन-लेक व्ह्यू, क्लियर टायटल, संपूर्ण तार कंपाऊड गेट, सिटी सर्वे, १६ गुंठे, 24 x 7 CCTV निरीक्षण, प्रीमियम लोकेशन, एस.टी. स्टॉपला लागून, नळ, इलेक्ट्रिकल पोल जवळच, White Transaction only, डायरेक्ट पार्टी, एजंट चालेल.
संपर्क - ९७६९१०८१७०

Unlock your Digital Curiosity
Learn Basic to Advanced Digital Skills!
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
Powered by AI-ML
mscit.mkcl.org
प्रवेशाची अंतिम तारीख: २५ सप्टेंबर २०२४
प्रवेशासाठी आजच MS-CIT केंद्राशी संपर्क साधा.

**आजचा अग्रलेख**
बस्स झाले आता हे धंदे

**वेधक**

## ‘आतिशी’ होणार दिल्लीच्या मुख्यमंत्री

**नवी दिल्ली :** अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर आता आतिशी यांच्या नेतृत्वाखाली आम आदमी पक्षाचे सरकार स्थापन होणार आहे. दिल्लीचे उपराज्यपाल व्हीके सक्सेना २१ सप्टेंबरला आम आदमी पक्षाच्या विधिमंडळ पक्षाच्या नेत्या आतिशी यांना मुख्यमंत्रीपदाची शपथ देतील. यासोबतच आम आदमी पक्षाच्या काही आमदारांनाही मंत्रिपदाची शपथ दिली जाणार आहे.

## आज दुपारपर्यंत रोप वे बंद

**महाड :** शिवप्रेमी व पर्यटकांसाठी रायगड किल्ल्यावर काही मिनिटातच जाण्यासाठी उपयुक्त असलेला रायगड रोप वे गुरुवारी १९ सप्टेंबरला दुपारी दोन वाजेपर्यंत बंद ठेवण्यात येणार आहे. आपत्कालीन स्थितीमध्ये प्रशासकीय यंत्रणा सज्ज आहे अथवा नाही, याची चाचणी घेण्यासाठी प्रशासनाकडून मॉक ड्रिल आयोजित केले जाते. अशाच प्रकारे गुरुवारी एनडीआरएफकडून रायगड रोप वे येथे मॉक ड्रिल आयोजित करण्यात आले आहे. त्यामुळे रोप वे सेवा दुपारी दोनपर्यंत बंद राहणार असल्याचे रोप वे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

### १५ राजकीय पक्षांचा विरोध, १५ पक्ष राहिले तटस्थ

# ‘एक देश, एक निवडणूक’

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

प्रादेशिक पक्षांना संपविण्याचा प्रयत्न करणाऱ्या केंद्र सरकारने बुधवारी एक देश एक निवडणूक प्रस्तावाला मान्यता दिली आहे. एक देश, एक निवडणूक या मुद्द्यावर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये मतमतांतरे असल्याचे अनेकदा समोर आले आहे. एक देश एक निवडणुकीबाबत मते जाणण्यासाठी सरकारने नेमलेल्या समितीकडे सभागृहात असणाऱ्या तब्बल १५ राजकीय पक्षांनी विरोध दर्शविला होता, तर १५ राजकीय पक्षांनी या प्रस्तावावर बोलणे टाळून तटस्थ भूमिका घेतली होती. केवळ टीडीपी, जेडीयू आणि एलजेपी या राजकीय पक्षांनी पाठिंबा दिला होता. यामुळे आता मित्रपक्षांच्या मदतीने एक देश एक निवडणुकीचा निर्णय लादण्यासाठीच्या हालचाली भाजप सरकारने सुरु केल्या आहेत. त्याला भविष्यात विरोधकांकडून विविध पातळीवर आव्हान देण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

### हि असणार आव्हाने

लोकसभेचा कार्यकाळ पाच वर्षांचा असतो, पण त्यापूर्वीही ती विसर्जित केली जाऊ शकते. अशा परिस्थितीत एक देश, एक निवडणूक शक्य होणार नाही. लोकसभेप्रमाणेच विधानसभेचा कार्यकाळही पाच वर्षांचा असतो आणि तोही पाच वर्षापूर्वी विसर्जित केला जाऊ शकतो. अशा परिस्थितीत एक देश, एक निवडणूक अशी व्यवस्था कशी राखायची हे सरकारसमोरील आव्हान असेल. एक देश, एका निवडणुकीवर देशातील सर्व पक्षांना एकत्र आणण्याचे मोठे आव्हान असेल, कारण यावर सर्वच पक्षांची मते भिन्न आहेत. एक देश, एक निवडणुकीचा फायदा राष्ट्रीय पक्षाला होईल, असे मानले जाते. सध्या देशात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका स्वतंत्रपणे घेतल्या जातात, त्यामुळे मर्यादित संख्येत ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी पान २ वर



### हे होणार तोटे

विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुका एकाच वेळी घ्यायच्या झाल्यास संविधानामध्ये दुरुस्ती करावी लागेल. विधानसभेच्या निवडणुका लोकसभा निवडणुकीशी संलग्न कराव्या लागतील. तसेच रिप्रेझेंटेशन ऑफ पीपल्स ॲक्टमध्ये दुरुस्ती करणे आवश्यक होईल. स्थानिक पक्षांचा या प्रस्तावाला विरोध असण्याचा सर्वात महत्त्वाचा मुद्दा हा आहे की, निवडणुकीदरम्यान ते स्थानिक प्रश्न प्रभावीपणे मांडू शकणार नाहीत. तसेच राष्ट्रीय पक्षांसोबत ते खर्च आणि रणनीती यामध्ये स्पर्धा करु शकणार नाहीत. पान २ वर

- प्रादेशिक पक्ष संपविण्याचा प्रयत्न
- सत्ताधारी विरोधकांमध्ये मतमतांतरे

गेल्या अनेक दिवसांपासून देशभरात चर्चा असलेला ‘एक देश, एक निवडणूक’ धोरणबाबत केंद्र सरकारकडून महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्रिय मंत्रिमंडळाने ‘एक देश, एक निवडणूक’ या धोरणाला मान्यता दिली आहे. राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली ‘एक देश, एक निवडणूक’ धोरण कितपत व्यवहार्य आहे, पान २ वर

## जम्मू काश्मीरमध्ये सुमारे ६० टक्के मतदान



**। जम्मू काश्मीर । वृत्तसंस्था ।**

जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदान बुधवारी सायंकाळी ६ वाजता संपले. २४ विधानसभा जागांसाठी मतदान झाले. सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदानाची टक्केवारी ५८.१९ टक्के होती. अंतिम आकडेवारी येणे बाकी आहे. किश्तवाडमध्ये सर्वाधिक ७७.२३ टक्के आणि सर्वात कमी पुलवामामध्ये ४३.८७ टक्के इतके होते. आज २३.२७ लाख मतदार मतदान करणार होते. भाजपचे उमेदवार पान २ वर

### ९० जागांवर तीन टप्प्यात मतदान

जम्मू-काश्मीरच्या ९० विधानसभा जागांवर १८ सप्टेंबर, २५ सप्टेंबर आणि १ ऑक्टोबरला तीन टप्प्यांत मतदान होणार आहे. ८ ऑक्टोबरला निकाल जाहीर होणार आहे. जम्मू-काश्मीरमध्ये १० वर्षांनंतर विधानसभा निवडणुका होत आहेत. २०१४ च्या निवडणुकीत पीडीपीला सर्वाधिक २८ आणि भाजपला २५ जागा मिळाल्या होत्या. दोन्ही पक्षांनी मिळून सरकार स्थापन केले होते.

## दहा दिवसांच्या बाप्पाला भावपूर्ण निरोप



(छायाचित्र : सुधीर नाझरे)

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

मनोभावे सेवेनंतर दहा दिवसांच्या लाडक्या बाप्पाला मंगळवारी भावपूर्ण निरोप देण्यात आला. वाजत गाजत मिरवणुका काढत भाविकांनी जल्लोष साजरा केला. गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या... असा जयघोष करीत जिल्ह्यातील नदी, तलाव, व समुद्रात १७ हजार ३५९ गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. त्यात रायगड जिल्ह्यामध्ये १७ हजार ३५९ गणेशमूर्तींचे विसर्जन होणार आहे. त्यामध्ये १४४ सार्वजनिक व १७ हजार ३५९ घरगूती गणेशमूर्तींचा समावेश होता.

जिल्ह्यात ७ सप्टेंबरला गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली. दहा दिवस भजनांसह बाल्या नृत्य, संगीत खुर्ची, शाळकरी मुलांना साहित्य वाटप अशा अनेक प्रकारचे सामाजिक, शैक्षणिक उपक्रमांसह धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलो होते. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने वेगवेगळ्या प्रकारचे समाजप्रबोधनाचे देखावे सादर केले होते. हे देखावे पाहण्यासाठी भाविकांनी अमाप गर्दी केली होती. पाहुणा पान २ वर

### पाली-खोपोली राज्य महामार्गावर अपघातांची मालिका

## दुचाकीची बसला धडक; तिघांचा मृत्यू

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

पाली खोपोली राज्य महामार्गावर मृत्यूचा सापळा बनत आहे. या राज्य महामार्गावर अपघाताची मालिका सुरूच आहे. एका पाठोपाठ जीवघेणे अपघात घडत आहेत. बुधवारी (दि.१८) दुपारी पाली खोपोली राज्य महामार्गावर कानसळ गावाजवळील नेव्ही कॉलेजसमोर दुचाकी स्कूल बसला धडकून अपघात झाला. या अपघातात दुचाकीवरील तिघेजण ठार झाले आहेत. या अपघाताचा धक्कादायक व्हिडिओदेखील समोर आला आहे.



(छायाचित्र : धम्माशिल सावंत)

श्रीराज एज्युकेशन सेंटरची स्कुलबस घोटवडे येथून शाळकरी मुलांना पालीकडे घेऊन जात होती. यावेळी पाली बाजूकडून खोपोलीच्या दिशेने वेगाने आलेली दुचाकी स्कूलबसला जाऊन धडकली. या दुचाकीवर पान २ वर

## शिक्षकांचे भवितव्य अंधारात?

### शिक्षक संघटनांचे सामुदायिक रजा आंदोलन

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्यात सुधारित शिक्षक संच मान्यता आणि कंत्राटी शिक्षक भरतीच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची भूमिका सरकारने घेतली आहे. ही अंमलबजावणी सुरू झाल्यास ग्रामीण भागातील एक लाख ८५ हजार विद्यार्थी आणि २९ हजाराहून अधिक शिक्षकांचे भवितव्य अंधारात जाण्याची भीती व्यक्त होत आहे. शासनाने हे दोन्ही निर्णय रद्द करावे यासाठी सर्व शिक्षक संघटना एकवटल्या आहेत. येत्या २५ सप्टेंबर रोजी सामूहिक रजा आंदोलन करीत प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे.

शिक्षक संच मान्यता बाबत सरकारने मागील मार्च महिन्यात निर्णय घेतला त्यानुसार वीस किंवा त्यापेक्षा कमी पट पान २ वर

### शिक्षण हक्क कायद्याची पायमल्ली

२० किंवा त्यापेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा एक शिक्षकी करून तेथे अतिरिक्त एक कंत्राटी शिक्षक नेमण्यात येणार आहे.त्यामुळे पंधरा हजार शाळांमधील एक शिक्षक कमी होणार आहे. राज्यात सध्या कार्यरत असलेल्या शिक्षकांपैकी २९ हजार ७०७ शिक्षक अतिरिक्त ठरणार आहे. शिक्षण हक्क कायद्यातील इयत्ता पहिली ते पाचवी तसेच सहावी ते आठवी या वर्गासाठीचा आकृतीबंध अद्याप लागू केलेला नाही.त्यामुळे बालकाच्या सक्तीच्या व मोफत शिक्षणाच्या अधिनियमाचे उल्लंघन होत असल्याचा आरोपही संघटनांनी केला आहे.

> “हे धोरण राबवून हळूहळू ग्रामीण दुर्गम भागातील शाळा बंद करण्याचा सरकारचा डाव आहे. भविष्यात समूह शाळा सुरू करण्याची ही सुरुवात आहे. या धोरणाला सर्व शिक्षक संघटनाचा विरोध आहे. त्यामुळे आम्ही या धोरणाचा निषेध करण्यासाठी २५ सप्टेंबरच्या आंदोलनाची घोषणा केली आहे.”
>
> – राजेश सुर्वे
> राज्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक परिषद

## जयंत पाटील यांच्याकडून कवळे कुटुंबियांचे सांत्वन



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

नवगांवमधील सामाजिक कार्यकर्ते बळवंत शंकर कवळे (७४ वर्षे) यांचे नुकतेच आजारामुळे निधन झाले. शेकाप नेते माजी आ. जयंत पाटील यांनी बुधवारी नवगाव येथे जाऊन कवळे कुटुंबियांची भेट घेतली. विचारपूस करून त्यांचे सांत्वन केले.

यावेळी रायगड बाजारचे उपाध्यक्ष प्रमोद घासे, माजी उपसरपंच फिडी कटोर, श्रीरंग कटोर, विद्यमान उपसरपंच निखील कवळे, सुरेंद्र कटोर, अरुण कवळे, नरेंद्र थळकर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व कवळे पान २ वर

## दापोडे येथे एसटीची कारला धडक



- अपघातातून एनसीसीचे ४५ विद्यार्थी बचावले
- कारमधील डॉक्टरसह एक गंभीर जखमी

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

पाली खोपोली राज्य महामार्गावर भीषण अपघाताची घटना घडली. या घटनेने सर्वांच्या काळजाचा ठोका चुकला. पालीनजिक असलेल्या दापोडे गावाजवळ मंगळवारी एनसीसीचे विद्यार्थी घेऊन जाणारी परिवहन महामंडळाची बस व कारचा भीषण अपघात झाला. यावेळी बसचा रॉड तुटला. चालकाच्या हातून बस अनियंत्रित होत बाजूच्या शेतात कलंडली, मात्र दैव बलवत्तर म्हणून यामध्ये ४५ विद्यार्थी बचावले. कारचे नुकसान झाले आहे. डॉक्टर, कारचालक व सोबत असलेला मित्र जखमी झाला असून त्याच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पाली खोपोली राज्य महामार्गावर कर्जतहुन एनसीसीचे विद्यार्थी घेऊन पालीकडून लोणेरेकडे जाणारी कर्जत आगाराची बस व पालीकडून खोपोली बाजूकडे आयुष गायकवाड चालवत असलेली सेलेरिओ कार यांचा समोरासमोर अपघात झाला. यावेळी एसटी बसचा पाटा तुटल्यामुळे स्टेरिंग लॉक झाले आणि एसटी बस हळुवारपणे बाजूच्या शेतामध्ये कलंडली. कारच्या सीट बेल्ट व एअर बॅग उघडल्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही मात्र कारचालकाच्या हाताला दुखापत झाली व शेजारच्या प्रवासाच्या डोक्याला लागले आहे.

एनसीसीचे विद्यार्थी लोणेरे येथे कॅम्पसाठी जात होते. अपघातानंतर हे विद्यार्थी सुखरूप असल्यामुळे त्यांनी दुसरी गाडी करून ते लोणेरेकडे रवाना झाले. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक व पोलिसांनी घटनास्थळी पोहचून मदतकार्य केले.


### मतांच्या राजकारणात माथेरान विकासात्मक दृष्ट्या पिछाडीवर; भूमिपुत्रांचे आजही संघर्षमय जीवन

# विधानसभा उमेदवारांना माथेरानचा विसर!

**मुकुंद रांजणे**
**। माथेरान ।**

माथेरान गावाला विकसनशील क्षेत्र बनण्यासाठी नेहमीच संघर्ष करावा लागला आहे आणि यापुढेही भावी पिढीला आपल्या न्याय हक्कासाठी संघर्ष करावा लागू नये यासाठी येथील आशावादी भूमिपुत्रांना आजही स्वप्नवत जीवन जगावे लागत आहे. इथली काही मोजकीच राजकीय पक्षांची मंडळी ज्यांना खरोखरच या गावासाठी काहीतरी नवीन करण्याची मनीषा आहे. त्यांनाही त्यांच्या पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांकडून कामे करण्यासाठी सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही.

तोपर्यंत आटोकाट प्रयत्न करावे लागत आहेत. एखाद्या पक्षाचे नेतृत्व विकासाची गंगा आणण्यासाठी कार्यक्षम असले तरीसुद्धा मुख्यमंत्री असोत किंवा अन्य खात्याच्या मंत्र्यांना ह्या गावाची कैफियत अथवा गाऱ्हाणी कथन करावयाची झाल्यास तालुक्यातील आमदार किंवा जिल्ह्यातील खासदार याना विश्वासात घेऊन जाणे क्रमप्राप्तच आहे. अन्यथा होणाऱ्या कामास देखील हेतूपूर्वक खोडा आणून कोणतीही विकास कामे पूर्णत्वास जाऊच शकत नाही याचा प्रत्यक्ष अनुभव स्थानिकांना आलेला आहे आणि ही येथील वस्तुस्थिती असल्याचेही स्थानिकांमधून बोलले जात आहे.



स्वातंत्र्यानंतर सुध्दा आपल्या न्यायहक्कासाठी माथेरानसारख्या दुर्गम परंतु जगप्रसिद्ध पर्यटनस्थळी पिढ्यानपिढ्या वास्तव्यास असलेल्या भूमिपुत्रांना संघर्षमय जीवन जगावे लागत आहे. काही प्रश्न असल्यास शासन दरबारी खेटे मारून कामे कशीबशी पूर्ण करून घ्यावी लागत आहेत आणि जी काही अशक्यप्राय कामे आहेत ती पूर्ण करण्यासाठी आमदार, खासदार यांना विनवण्या करून आशेवर राहावे लागत आहे. मतांच्या राजकारणात माथेरान पिछाडीवर पडले आहे आणि याचे मुख्य कारण म्हणजे इथली अल्प मतदार संख्या. त्यामुळे भविष्यात सुध्दा भूमिपुत्रांचे संघर्षमय जीवन राहणार की काय असा प्रश्न स्थानिक भूमिपुत्र उपस्थित करत आहेत. यासाठी प्रत्येक पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आपल्या उमेदवारांसाठी किती धावपळ करावी हे त्यांनी स्वतःहून जाणले पाहिजे.

काही दिवसांनी विधानसभा निवडणूका होणार असल्याने उमेदवारीसाठी कर्जत खालापूर मतदार संघात प्रत्येक पक्षात चढाओढ सुरू असून तालुक्यातील गल्लीबोळात प्रचाराची धामधूम सुरूच आहे, प्रत्येक पक्षात पक्षप्रवेश त्याचप्रमाणे मतदारांच्या भेटीगाठी सुरू असून जल्लोषात वाढदिवस आणि उत्सव साजरे होताना शक्तीप्रदर्शन जोरात सुरू आहे. आपली बाजू भक्कम असल्याचा अविर्भाव इच्छुक उमेदवार आणताना दिसत आहेत.

तालुक्यातील आदिवासी वाड्या असोत किंवा अन्य अडगळीच्या ठिकाणी कधी नव्हे ते तिथे जाऊन त्या भागातील लोकांची विचारपूस,त्यांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप, नादुरुस्त रस्ते, वीज,पाणी समस्या याबाबत जातीने लक्ष केंद्रित करत आहेत. याच मतदार पान २ वर

### कृषीवलच्या कार्यकारी संपादक

## माधवी सावंत यांना पितृशोक

**। अलिबाग प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील नागाव येथील माणिक दामोदर सावंत यांचे अल्पशा आजारामुळे मंगळवारी (दि.१७) सकाळी निधन झाले. निधनासमयी ते ७४ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कृषीवलच्या कार्यकारी संपादक माधवी सावंत यांचे ते वडील होतं.



माणिक सावंत हे स्थापत्य अभियंता होते. त्यांच्या आजारपणावर गेल्या अनेक दिवसांपासून मुंबई येथील रुग्णालयात उपचार सुरु होते. उपचारादरम्यान मंगळवारी (दि.१७) सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. नागाव येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शेतकरी कामगार पक्षाच्या राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, शेकापचे ज्येष्ठ नेते द्वारकानाथ नाईक, श्रीकांत आठवले, आक्षीचे सरपंच रश्मी पाटील, विकास पिंपळे आदी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर मंडळी, नातेवाईक, मित्रमंडळींनी उपस्थित राहून त्यांना श्रध्दांजली अर्पण केली. माणिक सावंत यांचे दशक्रिया विधी गुरुवारी (दि.२६) व उत्तरकार्य रविवारी (दि.२९) सप्टेंबरला त्यांच्या राहत्या घरी नागाव येथे होणार असल्याची माहिती सावंत कुटुंबियांनी दिली.

# पान १ वरुन

## 'एक देश, एक निवडणूक'

याचा अभ्यास करण्यासाठी एक समिती गठित करण्यात आली होती. या समितीने ' एक देश, एक निवडणूक' धोरणबाबत अनुकूल मत दर्शवत एक अहवाल सादर केला होता. या अहवालाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. यानंतर आता या धोरणाला संसदेत मंजुरी मिळणे आवश्यक आहे. यावरुन तीव्र राजकीय पडसाद उमटण्याची शक्यता आहे.'वन नेशन, वन इलेक्शन' च्या मुद्द्यावरुन आधीपासूनच सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये मतमतांतरं दिसून येत आहेत.

अशातच 'वन नेशन, वन इलेक्शन' बाबत निर्णय घेण्यासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने अहवाल देण्यात आला होता. हा अहवाल रामनाथ कोविंद समितीने केंद्रीय कॅबिनेट समोर ठेवला होता. जेडीयू आणि लोक जनशक्ती पक्षानेच काही दिवसांपूर्वी या धोरणाला पुन्हा एकदा समर्थन दिलं होतं. निवडणूक जाहीर झाली की आचारसंहिता लागते, ज्यामध्ये कुठल्याही नव्या घोषणा करता येत नाहीत. यामुळे विकास खुंटतो असं केंद्र सरकारचं मत आहे. तसं होऊ नये म्हणून एक देश एक निवडणुकीचा प्रस्ताव मांडला गेला. त्या दृष्टीनं केंद्र सरकारनं माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली समितीदेखील नेमली होती. या समितीनं प्रस्तावाच्या बाजूनं शिफारस केली होती, तसंच २०२९ साली एक देश एक निवडणूक घेता येईल असंही म्हटलं होतं.

माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या नेतृत्वाखालील समितीने ६२ राजकीय पक्षांशी संपर्क साधला होता. त्यापैकी ३२ पक्षांनी एक देश, एक निवडणुकीला पाठिंबा दिला होता. तर १५ पक्ष विरोधात होते. १५ पक्षांनी तटस्थ भूमिका घेतली होती. केंद्रातील एनडीए सरकारमध्ये भाजपशिवाय चंद्राबाबू नायडू यांचा टीडीपी, नितीश कुमार यांचा जेडीयू आणि चिराग पासवान यांचा एलजेपी (आर) हे मोठे पक्ष आहेत. जेडीयू आणि एलपीजी यांनी एक देश, एक निवडणूक यावर सहमती दर्शवली आहे. परंतु टीडीपीने यावर कोणतेही उत्तर दिलेले नाही. काँग्रेस, समाजवादी पार्टी, आम आदमी पार्टी, सीपीएम आणि बसपासह १५ पक्षांनी विरोध केला होता. तर झारखंड मुक्ती मोर्चा, टीडीपी, इंडियन युनियन मुस्लिम लीगसह १५ पक्षांनी कोणतेही उत्तर दिले नाही.

### हि असणार आव्हाने

आहेत, परंतु जर एकाच देशात निवडणुका झाल्या, तर या मशीन्सना मागणी वाढेल. ती पूर्ण करणे एक मोठे आव्हान आहे. निवडणुका एकाच वेळी घेतल्यास अतिरिक्त अधिकारी आणि सुरक्षा दलांची गरज भासेल. अशा परिस्थितीत हेही मोठे आव्हान असेल.

### हे होणार तोटे

२०१५ मध्ये आयडीएफसी इन्स्टिट्यूटने केलेल्या अभ्यासानुसार, ७७ टक्के शक्यता अशी असेल की लोक राज्यातील आणि केंद्रातील एकाच पक्षाला निवडून देतील. निवडणूक सहा महिन्यांच्या अंतराने ठेवली तर ६१ टक्के लोकच सारख्या पक्षाला मतदान करतील. एकत्र निवडणुकामुळे भारताच्या संघराज्य ढाच्याला धोका पोहोचू शकतो असा दावा काहीजण करतात.

## दहा दिवसांच्या बाप्पाला भावपूर्ण निरोप

म्हणून आलेल्या गणरायामुळे दहा दिवस संपूर्ण जिल्हा गणेशमय झाला होता. मंगलमय व आनंदमय वातावरण निर्माण झाले होते. दहा दिवस बाप्पाची मनोभावे सेवा करण्यात आली. त्यानंतर मंगळवारी (दि.१७) अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणरायाला निरोप दिला. बाप्पाला निरोप देताना अनेकांचे डोळे पाणावले होते.

## शिक्षकांचे भवितव्य अंधारात?

असलेल्या शाळांवर केवळ एकच शिक्षक असेल आणि दुसरा निवृत्त शिक्षक कंत्राटी स्वरूपात नेमण्यात येईल. त्याला राज्यातील सर्व शिक्षक संघटनेने विरोध केला होता. मात्र ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनी या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय शासनाने जाहीर केला. शासनाच्या या धोरणाचा सर्व शिक्षक संघटनेने विरोध केला असून सर्व संघटना समन्वय समितीची बैठक पुणे येथील शिक्षक भवन येथे पार पडली . या बैठकीत शासनाच्या भूमिकेवर विचार विनिमय करण्यात आला. या धोरणाचा विरोध करण्याचा एकमुखी निर्धार या बैठकीत घेण्यात आला. शासनाने हे धोरण राबविल्यास ग्रामीण दुर्गम डोंगराळ भागात राहणाऱ्या विद्यार्थ्यांची मोठे शैक्षणिक नुकसान होणार आहे. शिक्षणाचा दर्जा खालावून पालक आपल्या पाल्याला संबंधित शाळेत प्रवेश घेणार नाही पर्यायाने या शाळा बंद पडतील अशा शाळांची राज्यभरातील संख्या १४ हजार ७८३ इतकी आहे. यामुळे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतील अशी भीती व्यक्त होत आहे.

## विधानसभा उमेदवारांना माथेरानचा विसर !

संघात जेमतेम तीन हजारांच्या आसपास मताधिक्य असलेले माथेरान हे पर्यटनस्थळ सुध्दा समाविष्ट आहे. परंतु आजतागायत या स्थळाकडे संबंधित निवडून येणाऱ्या कोणत्याही पक्षाच्या लोकप्रतिनिधींनी आजवर कानाडोळाच केलेला दिसत आहे. आपल्या पक्षाला साधारणपणे माथेरानमधून एक हजारांच्या आसपास मते मिळणार आहेत. त्यामुळे निवडणूक काळात इकडे विधानसभा असो किंवा लोकसभा निवडणूक असो सहसा कुणीही उमेदवार वेळ वाया घालवत नाहीत आपल्या काही कार्यकर्त्यांना पाठवून जे काही निवडणुकीचे मतांबाबतचे व्यवहार आहेत. ते पूर्ण केले जातात.जणू काही या उमेदवारांना इथल्या मतांचे काहीएक स्वारस्य नसल्याप्रमाणे वागतात. आश्वासने ही नेहमीप्रमाणे दिली जातात पण मतांच्या राजकारणामुळे अल्प मतदान असल्याने इथली विकास कामे पूर्ण करण्याची विधानसभा उमेदवारांना माथेरानच्या विकासाबाबत इच्छाशक्ती नाही.निवडून आल्यावर सुध्दा इकडे फारसे फिरकत नाहीत. माथेरानकरांची काही मोठी मागणी नाही. फक्त याठिकाणी पर्यटनवाढीसाठी त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी अन्य ठिकाणी जाण्यासाठी उत्तम प्रकारे पर्यायी व्यवस्था निर्माण व्हावी. यासाठी फिनिक्युलर रेल्वे, प्रलंबित असणारा रोपवे प्रकल्प तसेच चौक येथून मोटार वाहन रस्ता थेट रामबाग पॉईंटपर्यंत उपलब्ध होऊ शकतो. ही होणारी कामे असून त्यासाठी निवडून येणाऱ्या आमदारांनी वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा करून कामे पूर्ण करणे बाकी आमची काहीच मागणी नाही असे जाणकार ज्येष्ठ मंडळी बोलत आहेत.

## जम्मू काश्मीरमध्ये सुमारे ६० टक्के मतदान

शगुन परिहार यांनी बागवान परिसरात ओळखपत्राशिवाय मतदान केल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे काही काळ मतदान थांबले होते.विविध राज्यात राहणारे ३५ हजारांहून अधिक विस्थापित काश्मिरी पंडितही मतदान करू शकतील. त्यांच्यासाठी दिल्लीत २४ विशेष बूथ बनवण्यात आले आहेत.

नॅशनल कॉन्फरन्सने काँग्रेसशी आघाडी केली आहे. जम्मूमध्ये काँग्रेस आणि भाजपने सर्व ताकद पणाला लावली आहे. त्याशिवाय मोठ्या संख्येने अपक्ष, अनेक लहान पक्ष, जमात-ए-इस्लामीचे निवडणुकीच्या राजकारणात पुनरागमन, इंजिनीयर रशीद या नेत्याची जामिनावर सुटका आणि त्यांच्या अवामी इत्तेहाद पार्टी (एआयपी) या पक्षाची अखेरच्या क्षणी जमातबरोबर झालेली युती हेही घटक निवडणुकीत महत्त्वाची भूमिका बजावण्यासाठी उत्सुक आहेत.

भाजपने काश्मीर खोऱ्यातील ४७ पैकी केवळ १९ मतदारसंघांमध्ये उमेदवार दिले आहेत. त्यामुळे एआयपीसारखे लहान पक्ष आणि अपक्ष भाजपच्या इशाऱ्यावर काम करत असल्याचा आरोप एनसीफ आणि पीडीपीफ करत आहेत. या १९ मतदारसंघांपैकी पहिल्या टप्प्यात आठ ठिकाणी मतदान होत आहे. पहिल्या टप्प्यात जम्मू व काश्मीर या दोन्ही विभागांमध्ये काँग्रेसचे प्रत्येकी चार ठिकाणी उमेदवार आहेत, तर एनसीचे जम्मूमध्ये सहा आणि काश्मीरमध्ये १२ उमेदवार आहेत.दुसऱ्या आणि टप्प्यातील मतदान अनुक्रमे २५ सप्टेंबर आणि १ ऑक्टोबर रोजी होणार आहे. तर, ८ ऑगस्ट रोजी मतमोजणी होणार आहे.

## दुचाकीची बसला धडक; तिघांचा मृत्यू

तिघेजण प्रवास करत होते. यावेळी स्कूलच्या पाठीमागून येणाऱ्या कारच्या डॅश कॅमेऱ्यात ही सर्व थरारक घटना कैद झाली आहे. अपघाताची माहिती मिळताच पाली पोलीस निरीक्षक सरिता चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक सचिन निकम, सहायक पोलीस निरीक्षक युवराज सूर्यवंशी आदींसह पोलीस उपस्थित होते. यावेळी पोलिसांसह अपघातग्रस्त मदत टीम, अमित खीस्मतराव आदींचे सहकार्य मिळाले.

## जयंत पाटील यांच्याकडून कवळे कुटुंबियांचे सांत्वन

कुटूंबिय उपस्थित होते. बळवंत कवळे हे डोंबिवली येथे नोकरीला होते. काही वर्षापूर्वी ते सेवानिवृत्त झाले. ते सामाजिक क्षेत्रात सक्रीय होते. सोमवारी (दि.९) सप्टेंबरला त्यांचे अल्पशा आजारामुळे निधन झाले. नवगांवमधील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकिय, सामाजिक आदी विविध क्षेत्रातील मंडळींनी उपस्थित राहून त्यांना श्रध्दांजली अर्पण केली. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, जावई, भाऊ व नातवंडे असा परिवार आहे. नवगांवचे उपसरपंच तथा शेकाप कार्यकर्ते निखील कवळे यांचे ते काका होतं. बळवंत कवळे यांचा उत्तरकार्य शुक्रवारी (दि.२०) सप्टेंबरला त्यांच्या राहत्या घरी होणार असल्याची माहिती कवळे कुटूंबियांनी दिली.


ॲड. स. गो. फडके

**जाहीर नोटीस** ने. ता. २२/१०/२०२४.

**अलिबाग येथील मे. जिल्हा न्यायाधिश सो. यांचे कोर्टात..**

ने. ता. दि.चौ.अ.नं. १४८/२०२४

नि.नं. ६/ड

श्रीमती तरण दयानंद वनगे — अर्जदार

विरुध्द

कोणीही नाही — सामनेवाला

सर्व तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, अर्जदार श्रीमती तरण दयानंद वनगे यांनी अलिबाग येथील जिल्हा न्यायालयात त्यांचा मुलगा कुमार शान दयानंद वनगे यांची नैसर्गिक अ.पा.क. म्हणून जन्मदात्री आई यांनी अज्ञानातर्फे व करीता सही करणेस व दस्त कायदेशीरपणे नोंदणी करणेस परवानगी मिळावी याकरीता अर्ज दाखल केला आहे. अर्जदार हिस अ.पा.क. म्हणून नेमण्यास कोणाची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याचे मुदतीत आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनीय कागदोपत्री पुराव्यासह मे. कोर्टात दाखल कराव्यात.

मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीमती तरण दयानंद वनगे ह्या कुमार शान दयानंद वनगे यांच्या नैसर्गिक अ.पा.क. म्हणून जन्मदात्री आई यांना अज्ञाना तर्फे व करीता सही करणेस व दस्त कायदेशीरपणे नोंदणी करणेस परवानगी मिळणे बाबत आदेश देण्यात येईल. मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर केले.

दिनांक : १८/०९/२०२४

सही/- लिपीक, जिल्हा न्यायालय अलिबाग

सही/- अधिक्षक, जिल्हा न्यायालय अलिबाग

**SRM E-TENDER NOTICE**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O&M)/DIVN/MHD/Tech/ E-Tender-39/2024-25 Dtd.18.09.2024. RFx No. - 7000033413 | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for Supply of Twin Terminal connector for Hybrid Pass at 220 kV Kandalgaon Substation EHV(O&M) Division Mahad | Rs. 1,85,260/- including GST |

EMD will be the 1% of the estimated cost or Rs.5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/-plus GST.

Bid submission is from 18.09.2024 @ 00:00 hrs to 24.09.2024 @23:59 Hrs for above tender for further details visit our website:-https://srmetender.mahatransco.in

**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089

Note: All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**-Sd/-**
**Executive Engineer, EHV(O&M) Dn. Mahad**

**महाराष्ट्र शासन**
**जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग**
**हिराकोट तळ्याजवळ, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड**
दूरध्वनी क्र. ०२१४१-२२४१३१ फॅक्स क्र. ०२१४१-२२४१३८
ई-मेलः-collector.raigad@maharashtra.gov.in ई-मेलः-dydeoraigad@gmail.com

क्र/निवडणूक /कार्या ६(२)/पोस्टर,बॅनर व इतर अनुषंगिक साहित्य निविदा/२०२४ दि. १८/०९/२०२४

**विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४**
**ई- निविदा सुचना क्रमांक ०१/२०२४**

पोस्टर, बॅनर, स्टिकर, प्रमाणपत्र व इतर अनुषंगिक बाबी पुरवठा बाबत ई निविदा सुचना आगामी **विधानसभा सार्वत्रिक** निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने संपूर्ण प्रक्रिये दरम्यान रायगड जिल्ह्यातील १८९-कर्जत, १९०-उरण, १९१-पेण, १९३-श्रीवर्धन व १९४-महाड या विधानसभा मतदार संघनिहाय जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी व नोडल अधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी पोस्टर, बॅनर, स्टिकर, प्रमाणपत्र व इतर अनुषंगिक साहित्य पुरवठा करणेसाठी अनुभवी व सुयोग्य अभिकर्त्याकडून विहित नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदा www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे.

**कामाचे नाव :-** रायगड जिल्ह्यातील १८९- कर्जत, १९०- उरण, १९१-पेण, १९३- श्रीवर्धन व १९४- महाड या विधानसभा मतदार संघामध्ये **पोस्टर, बॅनर, स्टिकर, प्रमाणपत्र व इतर अनुषंगिक साहित्य पुरवठा करणेबाबत..**

| | |
|---|---|
| निविदा अंदाजीत रक्कम | रू. २५ लक्ष |
| ई निविदा फार्म शुल्क | रू. ५,४००/- (विना परतावा) |
| इसारा/बयाणा (EMD) रक्कम | रू. ९०,०००/- |
| सुरक्षा अनामत रक्कम | रू. ७५,०००/- |
| ई-निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | दि. १८/०९/२०२४ सायंकाळी ०५.०० वा. |
| ई-निविदा भरण्याचा कालावधी | दि. १८/०९/२०२४ सायंकाळी ०५.०० वा. पासून ते दि.२४/०९/२०२४ सायंकाळी ०५.०० वा. पर्यंत |
| ई-निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ | दि.२४/०९/२०२४ सायंकाळी ०५.०० वा. |
| ई- निविदा फार्म क्रमांक-१(तांत्रिक लिफाफा) उघडणेचा दिनांक व वेळ | दि.२५/०९/२०२४ रोजी सायंकाळी ०६.०० वा. |
| ई- निविदा उघडण्याचे ठिकाण | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग यांचे कार्यालय |
| संपर्क अधिकारी | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग |

**निविदा भरताना सर्वसाधारण आवश्यक बाबी**

१ सदर निविदेच्या अटी व शती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. निविदा फी इसारा रक्कम www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरुन त्याची पावती स्कॅन क अपलोड करावी. (तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDF मध्ये तयार करुन Briefcase- I मध्ये अपलोड करावीत व दराचा लिफाफा PDF मध्ये तयार करुन Briefcase- II मध्ये अपलोड करावा.)

२ प्राप्त निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्विकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक रायगड यांनी स्वत: राखून ठेवले आहे. तसेच निविदा अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

३ सदरची निविदा काम प्राप्त करून देण्याची कोणतीही हमी देत नाही.

४ निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारानी क्लास III डीजीटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर स्वतः नाव नोंदणी करुन घ्यावी.

५ सदर अटी व शर्तीनुसार नमूद केलेली कागदपत्रे, निविदा खरेदीची पावती ई-निविदेत स्कॅन करुन PDF फॉर्ममध्ये सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.

६ लिफाफा क्र.१(तांत्रिक लिफाफा) मधील अट क्र.१ ते ११ मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रांपैकी एक जरी दस्तऐवज उपलब्ध नसल्यास निविदा अग्राह्य समजण्यात येऊन निविदेचा व्यापारी लिफाफा उघडण्यात येणार नाही.

सही/-
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा निवडणूक अधिकारी रायगड**

**माणगांव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित,**
**उतेखोल माणगांव - रायगड**

सव्विसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस (फक्त सभासदांसाठी)

मा.श्री./सौ.

माणगांव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित उतेखोल, ता. माणगांव या संस्थेच्या भागधारकांची सव्विसावी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. आनंद शिवराम यादव यांचे अध्यक्षतेखाली शुक्रवार दिनांक २०/०९/२०२४ रोजी सकाळी ठिक ११.३० वाजता चौधरी कॉम्प्लेक्स, निजामपूर रोड, माणगांव जि.रायगड येथे घेण्यांत येणार आहे. तरी आपण सर्वांनी सभेकरीता वेळेवर उपस्थित राहून सहकार्य घावे हि विनंती..

**** सभेपुढील कामे ****

१) दिनांक १०/०९/२०२३ रोजी झालेल्या पंचवीसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे लिखीत इतिवृत्त वाचून मंजुर करणे.
२) संचालक मंडळाने सादर केलेले ३१ मार्च २०२४ अखेरचे संस्थेचे नफा-तोटा पत्रक, ताळेबंद पत्रक व वार्षिक अहवाल वाचून मंजुरी देणे.
३) सन २०२३-२०२४ सालचा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल वाचून मंजुर करणे.
४) सन २०२३-२०२४ या वर्षासाठी मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मान्यता देणे व लाभांश जाहिर करणे.
५) सन २०२४- २०२५ सालच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
६) संस्थेच्या संचालक व त्यांचे नातेवाईकांस दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
७) सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता निबंधकांनी जाहिर केलेल्या पॅनलमधील पात्र वैधानिक लेखापरिक्षक यांची नेमणूक करणे.
८) तक्रार व तडजोड समिती स्थापन करणे.
९) अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी उपस्थित होणारे विषय.

संचालक मंडळाचे अनुज्ञेने,
**पुंडलिक तु. गायकवाड**
व्यवस्थापक
**माणगांव ग्रामीण बिगरशेती सह. पतसंस्था मर्यादित, उतेखोल-माणगांव**

दिनांक : ३१/०८/२०२४
ठिकाण: उतेखोल-माणगांव

**जाहिर नोटीस**

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे जिणे, ता. पेण जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल श्री. सुहास हरिदास पाटील यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक सुमित्रा गणपत म्हात्रे वगैरे ३ व श्री. जयदेव अविनाश पाटील यांच्याकडुन रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./गट नं./हि. नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| जिर्णे | २७५ | २.८४.८० पो. ख.०.०९.६० एकुण क्षेत्र २.९४.४० | १४.१९ |

वरील संपुर्ण क्षेत्रापैकी खरेदीखत लिहून देणार श्री. जयदेव अविनाश पाटील यांच्या हिश्याचे क्षेत्र ०.४०.०० हे. आर आकार १.९९ रू. पै. व खरेदीखत लिहून देणार सुमित्रा गणपत म्हात्रे वगैरे ३ यांच्या हिश्याचे क्षेत्र ०.६५.०० हे. आर आकार २.७६ रु.पै. हे दोन्ही क्षेत्र आमचे अशिल श्री. सुहास हरिदास पाटील हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करत आहेत

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ०७ (सात) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी. वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिपः- सदर नोटीस खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाणः- पेण
दिः- १८/०९/२०२४

**ॲड हेमा. ज. पाटील (घोडिंदे)**
साई श्रद्धा सबुरी बिल्डिंग बी-विंग,
ब्लॉक नं. ००२ प्रभु आळी, पेण

**-: जाहीर नोटीस :-**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, आमचे आशिलांनी मौजे भार्जे तालुका सुधागड जिल्हा रायगड येथील मिळकती त्यांचे मूळ मालक श्रीम. वंदना काशिनाथ रावकर रा. रोहा, ता. रोहा, जि. रायगड यांच्याकडून कायम स्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले. या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**-: मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे भार्जे, ता. सुधागड, जि. रायगड**

| सर्व्हे क्र./गट क्रं. | खाता नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| २४१ | १४६ | १-२५-०० | ०.५० |

सबब सदर मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लीज, तबदिल, धारणाधिकार, ताबा, भेट, देवाणघेवाण, विभाजन, शुल्क, ट्रस्ट वारसा किंवा इतर कोणत्याही प्रकारे हक्क, शिर्षक, व्याज, दावा किंवा मागणी असलेल्या आणि दावा करणाऱ्या कोणीही या प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तकारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत सही करणार यांचेकडे अगर खालील नमूद केलेल्या पत्त्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात अथवा प्रत्यक्ष भेट घ्यावी. याप्रमाणे कोणाचीही वरील मुदतीत तक्रार आली नाही, तर सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहीत व खरेदी घेणेस योग्य आहे असे समजून सर्व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती व तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजणेंत येईल व पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करण्यांत येईल. हे तमाम जनतेस कळावे.

ठिकाण :- पाली
दिनांक - १८/०९/२०२४

**(ॲड. अमोल रामचंद्र कांबळे)**
मु. पो. पाली ता. सुधागड जि. रायगड
मो. ९०२८२४८५१७

अर्जदार तर्फे वकिल
ॲड. गौरी म्हात्रे
निशाणी क्र. ६ ड

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो.यांचे कोर्टात**

दि.चौ.अर्ज क्र. १४१/२०२४

श्रीमती. वृषाली वैभव पाटील वगैरे १ — अर्जदार

विरुध्द

कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार क्रं. १ श्रीमती. वृषाली वैभव पाटील ही कै. वैभव शंकर पाटील यांची कायदेशीर पत्नी असून अर्जदार क्र. २ राज वैभव पाटील हा त्यांचा कायदेशीर मुलगा आहे.

कै. वैभव शंकर पाटील यांचे दि. २४/०७/२०२३ रोजी विक्रोळी पूर्व मुंबई येथे त्यांच्या घरी निधन झाले असून बृहन्मुंबई महानगरपालिका, एस विभाग मुंबई येथे त्यांच्या मृत्यूची नोंद केलेली आहे. कै. वैभव शंकर पाटील यांना अर्जदार क्रं. १ पत्नी व अर्जदार क्रं. २ मुलगा असे वारस आहेत. अर्जदार हे मयत कै. वैभव शंकर पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत असा वारस दाखला मा. न्यायालयाकडून मिळण्याकामी सदरचा अर्ज अर्जदार यांनी मा.न्यायालयात दाखल केलेला आहे. सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि खालील वारसदाखल्याबद्दल कोणाचे हक्क अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तकार वगैरे असल्यास त्यांनी तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसाच्या आत किंवा २५/१०/२०२४ रोजी पर्यंत या मा. न्यायालयात हजर होवून दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्कांबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

अलिबाग
दिनांक : १९/०९/२०२४ (कोर्टाचा शिक्का)

सही/-
**अधिक्षक दिवाणी न्यायालय**
**व. स्तर अलिबाग**

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल विद्या चंद्रकांत बनसोडे यांनी खालील नमुद केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक मनोज कमळाकर पाटील यांच्याकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी आमचे अशिल यांच्या सोबत झालेली आहे. सदरची मिळकत हि निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| पोयनाड ता. अलिबाग | १०५/२ | लागवड योग्य क्षेत्र ०-१८-०० पो.ख. ०-०२-०० एकुण ०-२०-०० | ०.३० |

वर वर्णन केलेली मिळकत ही या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरिल मिळकतींचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतींचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी (पळी आंबेघर),
पो. पोयनाड ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक पुंडलीक गणपत दाभाडे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे - मांडवणे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर-पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ७८/३ | एकुण ०-०८-०० हे आर पॉ | ०-०८ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १९/०९/२०२४

**ॲड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाच्या मौजे लोहारे, ता. पोलादपुर येथील मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान मालकांकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अनु. | मौजे | स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|---|
| १. | लोहारे | २१८/२४ | ०-३०-०० पो.ख.०-०२-०० ०-३२-०० | ०.१२ | १. श्री. प्रशांत प्रकाश टिंगरे, २. सौ. पल्लवी विक्रम कोरे ३. श्री. प्रकाश शंकर टिंगरे, |
| २. | लोहारे | २१८/२७ | ०-४६-०० पो.ख. ०-०६-०० ०-५२-०० | ०.२७ | सौ. पल्लवी विक्रम कोरे, |
| ३. | लोहारे | २१८/२८ | ०-५१-०० पो.ख.०-०६-०० ०-५७-०० पैकी ३० आर एवढी मिळकत | ०.२५ | श्री. प्रशांत प्रकाश टिंगरे, |
| ४. | लोहारे | २१८/२९ | ०-६४-०० पो.ख. ०-०९-०० ०-७३-०० | ०.५० | १. श्री. प्रशांत प्रकाश टिंगरे, २. सौ. पल्लवी विक्रम कोरे, ३. श्री. प्रकाश शंकर टिंगरे, |

सदरच्या सर्व मिळकती हया विद्यमान मालकांचे निर्वेध मालकीहक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती हया विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. १९/०९/२०२४

**ॲड. विधान अरविंद पाटील.**
'वत्सला' टिळक रोड, स्टेट बँकेसमोर
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड)**
**जाहिर नोटीस**

ज.म.र. अर्ज १६/२०२४

प्रति,
श्री. मच्छिंद्र मोरेश्वर पाटील — अर्जदार
रा. मेढेखार, पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड

विरुध्द

ग्रुप ग्रामपंचायत श्रीगाव, — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार श्री. मच्छिंद्र मोरेश्वर पाटील यांचा जन्म दि. १२/६/१९८६ रोजी राहत्या घरी मौजे मेढेखार, पोयनाड ता. अलिबाग रायगड येथे झाला आहे.

२. जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत श्रीगाव कार्यालय यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता अलिबाग न्यायालयांत जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम ११(२) व (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे.

३. मात्र यांचा जन्म नोंद ग्रामपंचायत श्रीगाव येथे केलेली नसल्याने त्यांना जन्म दाखला मिळण्यासाठी जन्म नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत श्रीगाव यांनी करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांनी तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केलेला आहे.

सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापुसान दि. २०/०९/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार अलिबाग तथा कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपत्नी हरकत/तक्रार नोंदवावी. मागावून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि.२०/०९/२०२४ रोजी माझ्या सही न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. कळावे.

ठिकाण : अलिबाग
तारिख : १८/०९/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

# कृषीवल गणेश दर्शन स्पर्धा २०२४



● मुरुड-मजगाव येथील मुर्तीकार चंद्रकांत बुल्लू यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले गणपती बाप्पा. (छायाचित्र : राजिव नेवासेकर)



● उपसरपंच ग्रुप ग्रामपंचायत न्हावे पांडूरंग कासकर यांच्या घरातील गणेशाची मुर्ती. (छायाचित्र : सत्यप्रसाद आडाव, चणेरा)



● (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)

● श्री. आश्रय शिंदे, किहीम-अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना किहीम सरपंच पिंट्या गायकवाड.



● मांडवा पोलीस ठाणे येथे विराजमान गणरायाचे दर्शन घेताना किहीम सरपंच पिंट्या गायकवाड. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)

● कोळगाव-अलिबाग येथील श्री. हिम्मत म्हात्रे यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना सासवणे ग्रामपंचायत सदस्या संजना पाटील



● मांडवा पोलीस ठाण्यात विराजमान गणरायाचे दर्शन घेताना सासवणे ग्रामपंचायत सदस्या संजना पाटील. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)

● कोळगाव-अलिबाग येथील श्री.दिलखूष म्हात्रे यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना सासवणे ग्रामपंचायत सदस्या संजना पाटील



● (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)

● कोळगाव-अलिबाग येथील श्री. सुजय म्हात्रे यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना सासवणे ग्रामपंचायत सदस्या संजना पाटील



● (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)

● कोळगाव-अलिबाग येथील श्री. राजन म्हात्रे यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना सासवणे ग्रामपंचायत सदस्या संजना पाटील.




● (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)

● शेकापक्षाचे आरसीएफ कामगार नेते श्री. सुरेश जगदाळे यांच्या किहीम साईनगर येथील निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना सरपंच पिंट्या गायकवाड.



● सरपंच ग्रुप ग्रामपंचायत न्हावे श्री नितीन हरिभाऊ डबीर आणि परिवार यांच्या निवासस्थानी गणेशाची मुर्ती. (छायाचित्र : सत्यप्रसाद आडाव, चणेरा)



● आवास येथील सामाजिक कार्यकर्ते श्री प्रज्योत अनंत राऊळ यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना किहीम सरपंच पिट्या गायकवाड. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● किहीम ता. अलिबाग येथील पवार बंधू कुटूंबियांचा एकत्रित असलेल्या गणरायाचे दर्शन घेताना सरपंच पिंट्या गायकवाड व सुरेश सावंत (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● किहीम-अलिबाग येथील मुर्तीकार श्री. विश्वनाथ सुर्वे यांच्या घरी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना सरपंच पिंट्या गायकवाड व सुदेश सावंत. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● किहीम-अलिबाग श्री. प्रशांत राऊत यांच्या घरी स्थानापन्न गणरायाचे दर्शन घेताना सरपंच पिंट्या गायकवाड व सुदेश सावंत. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● दिव-पेण येथील सदानंद कमलाकर म्हात्रे यांच्या निवासस्थानी गणेशाची मुर्ती.



श्री. सुमित संतोष म्हात्रे, रांजणखार-चिंचवली यांच्या निवासस्थानी बसलेले गणपती बाप्पा.



● (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)

बिली मॉरिया स्कुलचा राजाचे दर्शन घेताना किहीम सरपंच पिंट्या गायकवाड.



● कुरुळ येथील श्री. मयुरेश पाटील यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना किहीम सरपंच पिंट्या गायकवाड. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)

# एकमेकांशी संवाद साधा- डॉ. शितल जोशी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**


आधुनिकतेच्या जगतामध्ये वावरताना मोबाईलचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागला आहे. या यंत्र सामुग्रीमुळे जग जवळ आले असले, तरीदेखील आपल्या आजूबाजूला असलेल्या मंडळींपासून आपण दुर होत असल्याचे चित्र समाजात दिसून येत आहे. एकमेकांचा प्रत्यक्षात संवाद कमी होऊ लागला आहे. आत्महत्या रोखण्यासाठी एकमेकांशी संवाद महत्वाचा असून व्यक्त होणेदेखील गरजेचे आहे, असे आवाहन अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शितल जोशी-घुगे यांनी केले आहे. जागतिक आत्महत्या प्रतिबंधक दिवस नुकताच साजरा करण्यात आला. रूग्ण व त्यांचे नातेवाईक तसेच नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी आत्महत्येची



मनोसामाजिक कारणे, यावरील उपचार व उपाय या विषयावर जनजागृती पर कार्यक्रमाचे आयोजन अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयात करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाचे उद्घाटन अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शितल जोशी-घुगे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन करण्यात आले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या की, अनेकजण नैराश्यामुळे स्वतःचे जीवन संपविण्याचा प्रयत्न करतात. एक व्यक्ती गेल्याने त्यांच्या कुटूंबावर मोठे संकट येते याची जाणीव आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीला नसते. आत्महत्या हे समस्याचे निराकरण नाही, तर ती समस्या सोडविण्यासाठी आपल्या घरातील व परिसरातील खास व्यक्तीशी संवाद साधणे आवश्यक आहे. जिल्हा रुग्णालयात समुपदेशनासाठी डॉ. सिंह यांच्या नेतृत्वाखाली टीम काम करीत आहे. जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रमाची टीम उत्कृष्ट कार्य करीत आहे. यांच्या मार्फत पुरविण्यात येणाऱ्या समुपदेशन सेवांचा लाभ घेण्यात यावा, असे आवाहन कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. शितल जोशी यांनी केले.

यावेळी जिल्हा मानसोपचार तज्ञ डॉ. अर्चना सिंह, डॉ. हरेश, डॉ. सुजय इंगळे, सहाय्यक अधिसेविका अनिता भोपी, रुग्ण, त्यांचे नातेवाईक व परिचारिका उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल दामोदरे यांनी तर आभार समाजसेवा अधीक्षक धनेश्वरी कडु यांनी व्यक्त केले. तसेच, कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अर्चना सिंह यांनी केले.



● लालबागचा राजा मंडळाचे सदस्य व उद्योजक श्री. मुन्नाशेठ नेराळे यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना किहीम सरपंच पिंट्या गायकवाड. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)

## बस्स झाले आता हे धंदे

भाजपवाले स्वतः तर सर्रास खोटे बोलतातच. पण दुसऱ्याच्या तोंडी खोटेच काहीतरी टाकून आरडाओरड करणे हाही त्यांचा नेहमीचा धंदा झाला आहे. राहुल गांधी यांच्याविरुद्ध सध्या हेच चालू आहे. राखीव जागा बंद करू असे राहुल अमेरिकेत म्हणाले असा भाजपचा दावा आहे. राहुल यांची ही मुलाखत यूट्यूबवर कोणालाही पाहता येते. राखीव जागांचा विषय संपणार की नाही अशा आशयाची ही चर्चा मुलाखतीत चालू होती. त्याला उत्तर देताना राहुल म्हणाले आहेत की, भविष्यात जेव्हा सर्वांना संधी मिळू लागेल तेव्हा आम्ही राखीव जागा थांबवू. अशी समान संधीची स्थिती येत्या पन्नास वर्षात तरी भारतात येण्याची शक्यता नाही. त्यामुळे राहुल यांच्या म्हणण्याचा विपर्यास करून त्यावर जो गहजब चालला आहे तो अत्यंत घाणेरड्या पातळीवरचा आहे. भाजपला लोकसभा निवडणुकीत दणका बसला. भाजप घटना बदलणार असा खोटा प्रचार काँग्रेसने केल्याने आपण हरलो असे नरेंद्र मोदी यांच्यापासून सर्व नेते सांगतात. पण खुद्द मोदींनी ३७० जागा जिंकण्याचे ध्येय ठेवले होते. घटना बदलण्यासाठी इतक्या जागा आवश्यक आहेत असे त्यांच्या अनेक नेत्यांनी म्हटले होते. काँग्रेसने हे सर्व तपशील जोडले व जनतेपुढे मांडले. त्यातून भाजप राखीव जागा बंद करणार असा संदेश गेला. पूर्वी मोहन भागवतांनी राखीव जागांविरुध्द विधाने केलीच होती. भाजपचे काही नेते तसेच बहुसंख्य मतदार हे राखीव जागांमुळे देशाचे वाटोळे झाले असे पूर्वापार म्हणत आलेले आहेत. त्यामुळेच काँग्रेसच्या प्रचारावर लोकांचा विश्वास बसला. यामुळे आपला पराभव झाला असे भाजपच्या मनाने घेतले आहे. खरे तर मोदींचा कारभार व विरोधकांना संपवण्याची खुनशी वृत्ती यांच्या विरोधातही बरेच वातावरण आहे. त्याचाही फटका त्या पक्षाला बसला आहे. पण भाजप ते मानायला तयार नाही. त्याने घटना बदलण्याच्या खोट्या प्रचाराने आपल्याला हरवले हेच सूत्र धरून ठेवले आहे.

### शिंदे - सूर्यापेक्षा तापणारी वाळू

ही गोष्ट भाजपवाल्यांच्या इतकी जिव्हारी लागली आहे की ते आता राहुल यांच्यावर बाजी उलटवण्याची संधी शोधत आहेत. हा निव्वळ पोरकटपणा आहे. सलग तिसऱ्यांदा केंद्रातील सत्ता तुमच्या हातात आली आहे. चांगली कामे करून लोकांचा विश्वास जिंकण्याची संधी तुमच्याकडे आहे. त्याऐवजी काँग्रेस आणि राहुल गांधींविरुध्द खोटे बोलून आपल्याला फायदा होईल असे वाटावे हा भाजपवाल्यांच्या निर्बुध्दपणाचा कळस आहे. महाराष्ट्रात फडणवीस आणि बावनकुळे अशांपासून गावगन्ना सर्व नेत्यांनी राहुल यांच्या प्रतिमेला जोडे मारा वगैरे आंदोलने केली. एकनाथ शिंदे हे तर सूर्यापेक्षा वाळू अधिक तापते याचे साक्षात उदाहरण आहे. प्रत्येक वाक्यात मोदींचे नाव घेणे आणि मोदींच्या टीकाकारांवर तुटून पडणे हे ते करीत असतात. त्यानुसार शिंदे गटाच्या लोकांनीही अशी आंदोलने केली. मग त्यांच्यातले संजय गायकवाड यांच्यासारखे नेते आणखी पुढे गेले. राहुल यांची जीभ छाटणाऱ्याला अकरा लाख रुपयांचे बक्षिस त्यांनी जाहीर केले. अशा इसमाला खरे तर सरकारने तातडीने तुरुंगात टाकायला हवे. त्याला विधानसभेचे तिकिट तर सोडाच पण सार्वजनिक आयुष्यात राहण्याचा अधिकारही असता कामा नये. पण सध्या असल्याच गणंगांची चलती आहे. त्यामुळे त्यांना शिक्षा करणे तर दूरच, पण त्यांच्या प्रचाराला उद्या खुद्द मोदी आले तरी आश्चर्य वाटायला नको. राज्याच्या आणि देशाच्या राजकारणाचा या लोकांनी चिखल करून टाकला आहे. त्यामुळेच गायकवाड यांनी याबाबत माफी मागण्यास नकार दिला असून उलट काँग्रेसवाले कुत्रे आहेत असे नवे विधान त्यांनी केले आहे. याचेच आणखी एक उपप्रकरण म्हणजे गोपीचंद पडळकर यांनी शरद पवारांना महाराष्ट्राचा कॅन्सर असे म्हणणे. अशा लोकांना कोणीही अडवत नाही. उलट ते फडणवीस इत्यादींचे विश्वासू म्हणून त्यांच्या बरोबरीने प्रतिष्ठेने व्यासपीठावर बसतात.

### मठ्ठपणाचा कळस

त्यातच भाजपवाल्यांनी अलिकडे आणखी एक प्रकार सुरू केला आहे. विरोधकांना जाब विचारण्यासाठी आपणच आंदोलने करणे हा तो प्रकार. कोणत्याही सरकारकडे धोरणे आखण्याची व राबवण्याची सत्ता असते. त्यामुळे आजवर विरोधक त्यांच्याविरोधात आंदोलने करतात हे सर्वमान्य आहे. पण ती राजकीय स्पेसही आपणच खायची असे भाजपचे धोरण दिसते. म्हणूनच, तिकडे जरांगेंनी उपोषण सुरू केल्यावर शरद पवारांविरोधात भाजपवाले मोर्चे काढतात. वक्फ बोर्डाच्या प्रश्नावरून उद्धव ठाकरे यांच्या मातोश्रीवर मोर्चा काढण्याची फूस काही मुस्लिम आंदोलकांना दिली जाते. आताही राहुल यांच्या वक्तव्याबद्दल जाब विचारण्यासाठी रावसाहेब कसबे यांच्यासारखे विचारवंत आणि असीम सरोदे यांच्यासारखे कार्यकर्ते यांच्या घरावर वंचित बहुजन आघाडीवाल्यांना निदर्शने करायला लावण्यात आली. हा सर्वच अजब प्रकार आहे. लोकसभेच्या वेळी घटना बदलण्याचा प्रचार थोपवण्यासाठी मोदींनी राहुल यांच्यावर असेच अत्यंत वाह्यात आरोप केले होते. काँग्रेस सत्तेत आली तर तुमच्या राखीव जागा काढून मुस्लिमांना दिल्या जातील, किंवा तुमची मंगळसूत्रे काढून घेतली जातील असे ते म्हणाले होते. त्याही वेळी राहुल असे कोठेही म्हणालेले नाहीत हे मतदारांना स्पष्ट दिसत होते. काँग्रेसवर मतदार कितीही नाराज असले तरी राहुल त्यांची मंगळसूत्रे काढून घेतील हे लोकांना पटणे कठीणच होते. तरीही मोदी तो प्रचार रेटत राहिले. त्याला मतदारांनी थारा दिला नाही. उलट काँग्रेसचा प्रचार त्यांनी उचलून धरला हे भाजपवालेच मान्य करतात. अवघ्या तीन महिन्यांपूर्वी घडलेली ही गोष्ट विसरून पुन्हा भाजप तोच मठ्ठपणा करीत आहे. याचा अर्थ मोदी आणि मंडळींचा स्वतःच्या क्षमतेवरील विश्वास उडाला आहे. हीच मंडळी गेल्या दहा वर्षात दलित आणि आदिवासींसाठीच्या सर्वाधिक राखीव जागा आपण जिंकल्या आहेत असे गर्वाने सांगत होते. या मागास वर्गांचा भाजपवरचा विश्वास काँग्रेसच्या एका प्रचाराने खतम झाला असेल तर तो मुळातच तकलादू होता हे लक्षात घ्यायला हवे. त्यामुळे प्रति-आंदोलनांचे हे धंदे भाजपने थांबवावेत हे बरे.

---

विचार

# फुटीच्या उंबरठ्यावर पाकिस्तान

***धार्मिक साखळीत जखडलेल्या पाकिस्तानमधील विविध प्रांतांमधील बंडखोरीची आग अधिक तीव्र होत आहे. बलुचिस्तानपासून सिंधपर्यंत पाकिस्तानच्या फाळणीची रूपरेषा ठरली आहे. स्वतंत्र बलुचिस्तानची मागणी करणाऱ्या आणि पाया रचणाऱ्या अकबर बुगतीच्या पुण्यतिथीला बलुचिस्तान लिबरेशन आर्मीने पाकिस्तानला हादरा दिला. इथून पाकिस्तानच्या विविध भागात रक्तरंजित युद्धाचा नवा अध्याय सुरू झाला.***



**आरिफ शेख**

बलुचिस्तान गेल्या दोन दशकांपासून हिंसक बंडखोरीच्या विळख्यात आहे. बलुचिस्तानच्या प्रत्येक रस्त्यावर आणि प्रत्येक चौकात शाहबाज शरीफ यांच्या राजवटीच्या विरोधात आवाज उठवला जात आहे. 'बलुचिस्तान लिबरेशन आर्मी'च्या लोकांनी आधीच पाकिस्तानी लष्कराच्या अत्याचारापासून मुक्तीसाठी बंदुका हाती घेतल्या आहेत. आता या बंडाने पुन्हा एकदा रक्तरंजित रूप धारण केले आहे. त्यामुळे पाकिस्तानमध्ये गृहयुद्धाची परिस्थिती निर्माण झाली आहे. याचा अर्थ पाकिस्तानचे विघटन निश्चित आहे. अशा परिस्थितीत पाकिस्तानचे आता तुकडे होणार का, असा प्रश्न उपस्थित होतो. बलुचिस्तान पाकिस्तानच्या तावडीतून बाहेर पडून स्वातंत्र्याचा श्वास घेऊ शकेल का? अलिकडेच 'बलुचिस्तान लिबरेशन आर्मी'(बीएलए) ने पाकिस्तानच्या बलुचिस्तानमध्ये २३ जणांची गोळ्या झाडून हत्या केली. 'बीएलए' फुटीरतावाद्यांनी लोकांना बसमधून उतरवले. त्यांची ओळखपत्रे पाहिली आणि पंजाब प्रांतातील किती लोक आहेत हे तपासले. त्यानंतर त्यांची गोळ्या घालून निर्घृण हत्या करण्यात आली. धर्म आणि जातीच्या आधारावर प्रदीर्घ काळ पेटलेल्या पाकिस्तानमधील बलुचींनी शस्त्रे उचलून रक्तरंजित युद्धाचा नवा अध्याय सुरू केला आहे. पाकिस्तानमधील बहुतेक नैसर्गिक संसाधने सिंध आणि बलुचिस्तानच्या भागात आहेत; पण केंद्र सरकारकडून देशातील पैसा, सुविधा आणि राजकारणावर पंजाब प्रांताचे सर्वाधिक नियंत्रण आहे. याविरोधात बलोच आणि सिंध प्रांतात अनेक दिवसांपासून लढा सुरू आहे; मात्र आता हा संघर्ष रक्तरंजित झाला आहे. पाकिस्तानमध्ये दररोज गोळीबार होत आहे. लोकांचे रक्त सांडत आहे. पाकिस्तानचे तुकडे तुकडे झाल्याचा प्रतिध्वनी त्यांच्या प्रांतात रोज ऐकू येत आहे.

पाकिस्तानी मीडियाच्या वृत्तानुसार, बलुचिस्तान प्रांतात बंदुकीच्या ढिगाऱ्यावर उभ्या असलेल्या 'बलोच लिबरेशन आर्मी'ने हिंसेचा मार्ग पत्करला आहे. दरम्यान, बलुचिस्तानमधील राराशम भागात सशस्त्र लोकांनी आंतरराज्य महामार्ग अडवला. सशस्त्र लोकांनी १० हून अधिक वाहनांनाही आग लावली. रक्तरंजित युद्धांचा क्रम जुना आहे. असे रक्तरंजित हल्ले पाकिस्तानच्या विविध प्रांतात अनेक दिवसांपासून सुरू आहेत. पाकिस्तानचे अंधकारमय भविष्य आधीच ठरले होते; पण बलुचिस्तानसारख्या या प्रांतात अशा रक्तरंजित बंडाने 'जिनालँड'चा अंत निश्चित केला आहे. निरपराध लोकांच्या रक्ताने आणि गृहयुद्धाच्या आगीने वेढलेल्या पाकिस्तानला प्रदेश आणि प्रांतांच्या आधारावर रक्तरंजित युद्धांचा मोठा इतिहास आहे. बलुचिस्तानशिवाय पंजाब आणि सिंधमध्येही बंडखोरीची आग पाकिस्तानला भस्म सात करण्यास सज्ज आहे.

बलुचिस्तानमधील रक्तरंजित संघर्ष हे पाकिस्तानच्या विघटनाच्या दिशेने पहिले पाऊल मानले जात आहे. पाकिस्तानी मीडियानुसार, बलुचिस्तानमधील रक्तरंजित हत्याकांडाची ही घटना 'बलुचिस्तान लिबरेशन आर्मी'ने 'ऑपरेशन हेअरऑफ'अंतर्गत घडवून आणली. संपूर्ण बलुचिस्तानमध्ये 'ऑपरेशन हेअरऑफ' सुरू आहे. 'बीएलए'च्या दाव्यानुसार कारवाईअंतर्गत ६२ पाकिस्तानी सुरक्षा कर्मचारी मारले आहेत. 'बीएलए'ने म्हटले आहे की मारले गेलेले पाकिस्तानी सुरक्षा कर्मचारी नागरिकांच्या वेशभूषेत बसमधून प्रवास करत होते आणि त्यामुळेच त्यांची ओळख पटवून हत्या करण्यात आली. या संघटनेने एक रेल्वे पूलही उडवून दिला. आपला नेता नवाब बुगतीच्या स्मरणार्थ या मंडळींनी हा हल्ला केल्याचे मानले जाते. नवाब बुगतीच्या पुण्यतिथीनिमित्त पाकिस्तान हादरला आहे. परवेझ मुशर्रफ यांच्या काळात नवाब बुगतीची हत्या झाली होती. संपूर्ण बलुचिस्तानमध्ये सुरुवातीपासूनच पाकिस्तान सरकारविरोधात संताप आहे. पाकिस्तानी प्रसारमाध्यमे आणि तेथील तज्ज्ञांचेही मत आहे की पाकिस्तानी सरकारची बलोच नागरिकांविरुद्धची वृत्ती नेहमीच दडपशाहीची राहिली आहे. राजकारणात पंजाब प्रांताचा दबदबा असल्याने बलुचिस्तान आणि सिंधमध्ये बंडाचे वादळ आले आहे. कारण पाकिस्तानमधील नैसर्गिक संसाधने बहुतेक सिंध आणि बलुचिस्तानच्या भागात आहेत; पण पाकिस्तानची सरकारे पंजाब प्रांताला जास्तीत जास्त निधी, सवलती आणि सुविधा देतात. पाकिस्तानच्या राजकारणातही पंजाब प्रांताचे वर्चस्व राहिले आहे.

या अन्यायामुळे बलुचिस्तान आणि सिंध प्रांतात बऱ्याच दिवसांपासून पाकिस्तानी राज्यकर्त्यांविरुद्ध बंडाचा बिगुल वाजत आहे आणि रक्तरंजित चकमकी होत आहेत. बंडखोरी, दहशतवाद आणि शत्रूंनी पाकिस्तान वेढला आहे. पाकिस्तान बलुचिस्तानमधील चीनच्या प्रकल्पांमुळे येथील लोकही प्रचंड संतापले आहेत. याबाबत अनेक वेळा हिंसक निदर्शनेच नव्हे, तर हत्याही झाल्या आहेत. पाकिस्तानची अंतर्गत परिस्थिती इतकी बिकट आहे की त्याच्या विघटनाबद्दल शंका नाही. खुद्द पाकिस्तानीही 'जिनालँड' गृहयुद्धाच्या उंबरठ्यावर उभा आहे असे मानतात. पाकिस्तान पूर्णपणे बंडखोरी, दहशतवाद आणि शत्रूंनी वेढलेला आहे.

त्याचबरोबर पाकिस्तानच्या सत्ताधाऱ्यांमुळेच देशांतर्गत बंडखोरी आणि गृहयुद्धाच्या धोक्याला बळ मिळाले आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे. पाकिस्तानातील सिंध प्रदेशालाही बलोच आणि पश्तूनप्रमाणे पाकिस्तानपासून वेगळे व्हायचे आहे. बलुचिस्तानप्रमाणेच सिंध हाही पाकिस्तानचा प्रांत आहे. त्यालाही पाकिस्तानच्या क्रूर राज्यकर्त्यांपासून दीर्घकाळ सुटका हवी आहे. सिंधमध्ये जवळपास पाच दशकांपासून स्वातंत्र्याचा नारा घुमत आहे. आतापर्यंत पाकिस्तानचे सैन्य बंदुकींनी हे आवाज शांत करत होते; पण आता हा आवाज उघडपणे जगापर्यंत पोहोचत आहे.

सिंध हा पाकिस्तानचा सर्वात श्रीमंत प्रांत आहे. पाकिस्तानचे ७० टक्के उत्पन्न सिंधमधून येते; मात्र त्यावर सिंधींचा अधिकार नाही. आर्थिक संकट, अन्नधान्याचे संकट आणि वीजसंकटाचा सामना करणाऱ्या पाकिस्तानमध्ये सुरक्षेचेही मोठे संकट आहे. १९७१ मध्ये तत्कालीन पूर्व पाकिस्तान (आता बांगलादेश) गमावणारा पाकिस्तान पुन्हा एकदा विघटनाच्या मार्गावर आहे. तिथल्या नेत्यांच्या वक्तव्यातून आणि परिस्थितीवरून असे संकेत मिळत आहेत. गेल्या महिन्यात पाकिस्तानी खासदार मोहसीन दावर म्हणाले की दहशतवाद्यांनी उत्तर वझिरीस्तानमधील अनेक भाग ताब्यात घेतले आहेत. मुद्दा असा आहे की आम्ही अजूनही वस्तुस्थिती मान्य करण्यास नकार देत आहोत; जणू काही झालेच नाही. पाकच्या गृहमंत्र्यांनी सुमारे १० हजार दहशतवादी कार्यरत असल्याची कबुली दिली. एवढेच नाही, तर डिसेंबर २०२२ मध्ये पाकिस्तानचे गृहमंत्री राणा सनाउल्लाह यांनी स्वतः कबूल केले होते की खैबर पख्तूनख्वा प्रांतात सात ते दहा हजार दहशतवादी आहेत. टीटीपी ही संघटना आज पाकिस्तानसाठी मोठा धोका बनली आहे. ती पाकिस्तानवर हल्ले करत आहेत. पाकिस्तानच्या सार्वभौमत्वावर प्रश्न उपस्थित करत आहे. 'टीटीपी'ने पाकिस्तानमध्ये आपले सरकार जाहीर केले. त्यांनी आपले मंत्रिमंडळही जाहीर केले आहे. ज्यातील विविध लोकांना संरक्षण, राजकीय व्यवहार, आर्थिक व्यवहार, शिक्षण विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे. हे प्रतिकात्मक पाऊल असले तरी पाकिस्तानसाठी खुले आव्हानही आहे. गिलगिट बाल्टिस्तानमध्येही पाकिस्तानविरोधात असंतोष आहे. पाकव्याप्त काश्मीरच्या गिलगिट बाल्टिस्तानमध्ये पाकिस्तानच्या विरोधात मोठे आंदोलन सुरू आहे. त्यातही स्वातंत्र्याची मागणी केली जात आहे. येथे आंदोलक रस्ता कनेक्ट करा, कारगिल रस्ता खुला करा अशा घोषणा देत आहेत. आंदोलक गिलगिट, बाल्टिस्तान आणि लडाखला जोडणारा रस्ता खुला करण्याची मागणी करत आहेत. काही रिपोर्टसमध्ये असा दावा करण्यात आला आहे की येथील लोकांना लडाखमध्ये राहणाऱ्या बाल्टी समुदायाच्या लोकांशी पुन्हा संपर्क साधायचा आहे. त्यातच चीनच्या 'सीपीईसी' (चीन-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉर)ला स्थानिकांचा विरोध आहे. खनिज संपत्ती लुटून चीन या प्रांताचा फायदा घेत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. तिथे चिनी नागरिक आणि अधिकाऱ्यांवर हल्ले होत आहेत. पाकिस्तानचे तुकडे होणे भारतालाही परवडणारे नाही. आशिया खंडातील भूतान वगळता एकही देश भारताच्या बाजूने नाही. त्यातच पाकिस्तानचे आणखी देश झाले, तर भारताची सीमा आणखी असुरक्षित होण्याचा धोका आहे. बांगलादेशच्या मुक्तीसंग्रामात भारताने मदत केली; परंतु तोच बांगलादेश भारताची डोकेदुखी ठरतो. या पार्श्वभूमीवर पाकिस्तानमध्ये मजबूत लोकशाही आणि चांगले सरकार असणे भारताच्या हिताचे आहे.

---

आजकाल

# कसबे यांच्याविरुद्धची निदर्शने अनुचित

सद्य काळात काही अकल्पित घटना घडत आहेत. ज्यांची संगती लावणे अवघड जाते. आंबेडकरवादी दृष्टीतून तर हे काय चालले आहे कळेनासे होते.

**सुभाष थोरात**

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध आंबेडकरवादी विचारवंत रावसाहेब कसबे यांच्या घरासमोर काही आंबेडकरवादी म्हणूवून घेणाऱ्या संघटनांनी निदर्शने केली आहेत.

राहुल गांधी यांनी त्यांच्या अमेरिकन दौऱ्यात आरक्षणा बद्दल जी मांडणी केली आहे, ती आरक्षण विरोधी, आरक्षण नष्ट करणारी आहे अशी भाजप वाल्यांनी हुल उठवली, ते त्यांच्या खोटे पणाच्या राजकारणाला साजेशे आहे. त्यांच्या नेहमी चोराच्या उलट्या बोंबा असतात. फॅसिस्ट नेहमी सत्तेवर येतात ते असे खोटे बोलून. हा त्यांचा जगभरचा इतिहास आहे. जसा हिटलरने एकही सत्य शब्द उच्चारला नाही तीच गोष्ट यांच्या बाबत बोलता येईल.

भाजपाने राहुल गांधी यांच्या संदर्भात राजकीय सोयीसाठी पसरवलेले १००% झूट उचलून वरील स्वतःला आंबेडकरवादी म्हणून घेणारे संघटनांचे बहादुर उर बडवत आहेत. हे सरळ सरळ त्यांचे राजकारण आहे. पण त्यासाठी त्यांनी थेट राहुल गांधीच्या किंवा काँग्रेसच्या ऑफिसवर निदर्शने करणे योग्य ठरले असते. पण तसे न करता ज्यांचा काडीचाही संबंध नाही काडीचाही दोष नाही. त्यांना वेठीस धरणे कितपत समर्थनीय आहे.

राहुल गांधी यांच्या विधानात आरक्षण विरोधी एकही शब्द नाही. उलट आरक्षण असूनही देशातील महत्त्वाच्या संस्थांमध्ये प्रशासकीय, आर्थिक, मीडिया मध्ये दलित आदिवासी ओबीसी समाजाला कसे एक टक्का सुद्धा प्रतिनिधित्व नाही हे ते उच्चवर्णीयांच्या विरोधातील सर्व धोके पत्करून मांडत आहेत. भाजपला उठलेला पोट सूळ तोच आहे.

खुद्द बाबासाहेब आंबेडकरांनी आरक्षण कधी नष्ट करता येईल याबद्दल जे उत्तर दिले होते तेच उत्तर राहुल गांधींनी दिले आहे जोपर्यंत समतेच्या पायावर, न्यायावर, संपूर्ण समाज उभा नाही. तोपर्यंत आरक्षण संपवण्याबद्दल विचार करता येणार नाही. यात काय चूक आहे. हे राहुल गांधी विरुद्ध निदर्शने करणाऱ्या प्रबुद्ध लोकांनी दाखवून द्यावे.

पण अलिकडच्या काळात भाजपाच्या नेतृत्वाखाली राजकारणाची पातळी इतक्या नीच पातळीवर आणली गेली आहे की या पातळीवर स्वतःला आंबेडकरवादी म्हणूवून घेणारे कसे काय उतरू शकतात हे आम्हाला कळत नाही.

बसपाच्या नेत्या मायावतींनी हीच री ओढली आहे. त्यात त्यांचे सुद्धा राजकारण आहे. खरं तर आजची संपूर्ण दलित चळवळ मग ती बिहार मधील असो, उत्तर प्रदेशातील असो अथवा महाराष्ट्रातील असो, प्रत्यक्ष अप्रत्यक्ष भाजपाच्या दावणीला बांधली गेली आहे. हे ''आधुनिक'' हनुमान रामराज्य तर आणतीलच आणि छाती फाडून दाखवतील पहा मोदी-शहा कसे आमच्या हृदयात वसले आहेत.

आंबेडकर वादाच्या संदर्भात सर्वाधिक लिखाण रावसाहेब कसबे यांनीच केले आहे. आणि त्यानंतर आनंद तेलतुंबडे यांनी. विचारवंतांना साजेशे अत्यंत दर्जेदार, विचारांना चालना देणारे आणि भारतीय परिस्थितीत आंबेडकर वादाचा अर्थ कसा लावावा त्याची सर्वांगीन मांडणी त्यांच्या लिखाणातून पुढे येते. महाराष्ट्रात आणि देशात आंबेडकरवादी संकल्पना आणि तिचे वेगवेगळ्या विषयावरचे आयाम यांची सूत्रबद्ध मांडणी त्यांच्या लिखाणात आढळते.

बाबासाहेबांनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिका त्या वेळेच्या राजकीय सामाजिक पार्श्वभूमीवर कशा गरजेच्या आणि राजकीय दृष्टीने कशा अचूक होत्या हे रावसाहेबांनीच वेळोवेळी ठामपणे मांडले आहे. खरंतर त्यासाठी त्यांना नेहमीच आदराने जय भीम केला केला पाहिजे. ''झोत'' हे आरएसएसच्या विचारांची चिरफाड करणारे, खूप गाजलेले पुस्तक सर्वांना ठाऊक आहे. पण धर्म चिंतन, भक्ती चळवळ, महात्मा गांधी यांच्या संदर्भातील त्यांची पुस्तके त्यांनी आंबेडकरवादी विचारांचा पेस किती सर्वांगीण केला याची साक्ष देणारी आहेत. असे असूनही रावसाहेब यांचा दोष एकच ते मार्क्सवादाचे सहानुभूतीदार आहेत. त्यामुळे आंबेडकर चळवळीतील एका विभागाचा खूप मोठा रोष त्यांच्यावर आहे. हा रोष इतका मोठा आहे कि ते जणू शत्रूच आहेत असे वाटवे. हा विभाग त्यांच्या बरोबर वैचारिक वाद न घालता त्यांनी मांडलेले मुद्दे तर्कशुद्ध पद्धतीने आणि ते समजतात त्या आंबेडकरवादी दृष्टीतून खोडून न काढता केवळ चिखलफेक करत असतात. ही या विभागाची अस्मितेचे राजकारण पुढे आणून अस्तित्व टिकवण्याची गरज आहे.

एक वाद म्हणून जेव्हा आपण आंबेडकरवादाकडे पाहतो तेव्हा प्रचलित राजकीय, सामाजिक व्यवस्थेतील, भारतीय आणि जागतिक पातळीवरच्या प्रश्नाची उत्तरे देण्याची, शोधण्याची जबाबदारी आपणावर येते. रावसाहेब यांनी आंबेडकरवादी दृष्टीने जे प्रतिपादन केले आहे त्यातूनच हे शक्य होते. असो. या संदर्भात फार पूर्वी मी एक कविता केली होती. ती येथे देणे उचित ठरेल .

**त्यांच्या बंडखोर पावलांवर**
**उधळले गेले प्रलोभनांचे ताजमहाल**
**तेव्हाच ते विसरून गेले**
**उद्ध्वस्त नगर**
**आणि ओल्या जखमांची जळती आठवण**
**त्यांच्या गल्लत पावलांवर**
**राहिली नाही**
**एकही अस्मितेची खूण**
**त्यांचा आक्रोश झाला**
**पोटभरू भिकाऱ्या**
**इतका मर्यादित**
**जाहीर शिरकाण होताना**
**त्यांनी वापरली**
**धंदेवाई दृष्टी**
**त्यानीं अजूनही**
**पावले तपासून घ्यावीत.**
**उद्या पेटलेले आभाळ**
**त्यांना क्षमा करणार नाही.**

**(साभार)**

---

# मराठी साहित्यिक दिनविशेष

**१७ सप्टेंबर**

**१८८८ :-** कवी दामोदर माधव कुलकर्णी यांचा जन्म. प्रसिध्दीविषयी उदासीन असल्याने त्यांच्या कवितांची हेळसांड झाली. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या चाहत्यांनी 'माधवसुत' या नावाने काव्यरत्नावली, मनोरंजन आदी मासिकातून त्यांच्या कविता प्रसिध्द केल्या. आत्मभाव व्यक्त करणाऱ्या त्यांच्या कविता निराशेने खचलेल्या कविमनाचे आर्त उद्गार त्यातून प्रकट झाले आहेत. जुन्या संस्कृत मराठी व नव्या इंग्रजी कवितेचा ठसा त्यांच्या कवितेवर उमटलेल्या दिसून येतो. **१९१७:-** लेखक, भारतीय संस्कृती कोशाचे कोशाध्यक्ष अनंत अंबादास कुलकर्णी यांचा जन्म होनी 'मी जेनी' हे घरात पाळलेल्या कुत्रीचे आत्मकथन. तसेच 'लेखकाला हे माहित असावे' अशी आगळी वेगळी पुस्तके त्यांनी लिहिली. १९३६ हिंदुस्थानी संगीत क्षेत्रातील एक युगप्रवर्तक संशोधक, संगीत शास्त्रकार, संगीत प्रचारक, लेखक विष्णू नारायण भातखंडे यांचे निधन. संगीत या विषयावर त्यांनी विपूल प्रमाणात लेखन केले. हिंदुस्थानी संगीत पध्दती' ह्या अडीच हजार पृष्ठांच्या प्रचाशिवाय गीतमालिका, पारिजात प्रवेशिका, रागविबोध प्रवेशिका याशिवाय काही संग्रह स्वरुपाचे ग्रंथ त्यांच्या नावावर आढळतात. १९३८:लेखक, पेशाने वकील विष्णू तुकाराम गुंजाळ यांचा जन्म. चिमणा राबू' ह्या कथासंग्रहासह 'बेणं' ही कादंबरी त्यांची प्रकाशित झाली आहे. **१९४१:** लेखक मनोहर वि जोगळेकर यांचा जन्म. ह्यांच्या अनेक कथा, कविता, लेख, निबंध विविध मासिकातून प्रकाशित झाले असून आतापर्यंत सहा पुस्तके प्रकाशित झाली आहेत. **१९४८ :** साहित्य संशोधक, संपादनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे लेखक डॉ. राजेंद्र वाटाणे यांचा जन्म. 'स्वा. सावरकर आणि साने गुरुजी यांच्या काव्यातील स्वातंत्र्यविषयक चिंतन (प्रबधिक)', संत सेना महाराजांच्या अभंग वाड्मयाचा सर्वांगीण अभ्यास' आणि संत नामदेवांची हिंदी रचना' व 'गुरु ग्रंथ साहेबांची पदे : एक अध्ययन' आदी विषयांत संशोधन तसेच साहित्य : ग्रामीण आणि दलित', 'चंदन वाडीच्या निमित्ताने' हे संपादन, विविध वृत्तपत्रातून प्रासंगिक व वैचारिक लेखन आणि 'संत सेना महाराज : काव्यदर्शन' या ग्रंथातून सेना महाराजांच्या अभंग वाड्मयाचा सर्वांगीण अभ्यास वस्तुनिष्ठपणे व समर्थपणे केला आहे. **१९५४ :** कथालेखक प्रमोद बाळकृष्ण जोशी यांचा जन्म. 'आभाळाची सावली' हा कथासंग्रह त्यांचा प्रकाशित झाला आहे. **१९५४:-** लेखक, वक्ते अरविंद एकनाथ नेरकर यांचा जन्म. ह्यांचे विविध विषयांवर ४०० पेक्षा आधिक लेख प्रकाशित झाले असून 'श्री गजानन महाराज दर्शन', 'श्री सप्तशृंग दर्शन' अशी धार्मिक विषयांवरील ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. **१९५९:** बालसाहित्यिक देवबा शिवाजी पाटील यांचा जन्म. 'कल्पना', 'वीजयामिनी', 'सोनलतिका', 'उमलती फुले' या काव्यसंग्रहासह 'अटकमटक', 'बालबाग', 'सुबोध पाढे' हा बालकाव्यसंग्रह तसेच 'इंद्रधनूचे तोरण', 'जीवनदायिनी पहाट', 'आभाळाचे रंग' हे कुमार कथासंग्रह अशी पुस्तके लिहिलीत. **१९७० : -** लेखक, शिक्षक, शास्त्रज्ञ गोविंद चिमणाजी माटे यांचा जन्म. वीस एक पुस्तके त्यांच्या नावावर असून त्यातील बारा पुस्तके प्रवासवर्णनात्मक आहेत. याखेरीज 'अर्थशास्त्राची मुलतत्त्वे' हा माटे यांनी मराठीत स्वतंत्रपणे लिहिलेला पहिलाच अर्थशास्त्र विषयक ग्रंथ तसेच प्रेम की लौकिक' ही कादंबरी 'तीन तत्त्वज्ञानी', 'कॅन्ट व शंकराचार्य', 'लघुकथा चतुष्ट्य' ही त्यांची अन्य साहित्य संपदा. **१९७१ :-** कवी प्रसेनजित गजानन गायकवाड यांचा जन्म. 'आनंदाचे यात्री' हा बालकाव्यसंग्रह त्यांचा प्रसिध्द झाला आहे. **१९९२ :-** साहित्यिक ना. रा. शेंडे यांचा जन्म. ह्यांच्या साहित्य संपदेत दलितांना उद्देशून 'दलितांचे जग' हे वैचारिक, 'दुर्गादर्शन आणि काही कविता' हे काव्यसंग्रह, 'सावली' हा लघुकथासंग्रह, 'काजळी रात्र', 'अंशुजा' मिळून चार कादंबऱ्या तसेच ग. ग. गवई, के. ढवरे, बाबासाहेब तिरपुडे, संशोधक डॉ. गेडाम आदींची चरित्रे मिळून १५ पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. **२०१५ :-** 'मयुरा रे फुलवित ये रे पिसारा', 'वाटे भल्या पहाटे यावे', 'पूर्वेच्या देवा तुझे सूर्यदेव नाव' अशी अवीट गोडीची गाणी संगीतबध्द करणाऱ्या ज्येष्ठ संगीतकार वीणा चिटको यांचे निधन.

**- संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

# राणेंनी मान्य केली नितेशची चुक

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

भाजप आमदार नितेश राणे हे आपल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे अनेक वेळा अडचणीत आले आहे. सध्या ते आपल्याला कट्टर हिंदूत्ववादी असल्याचे दाखवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यातून त्यांच्याकडून मुस्लीम विरोधी वक्तव्य येत आहेत. त्यांनी नुकतेच मस्जिदमध्ये घुसून मारू असे वक्तव्य केलं होतं. त्यानंतर त्यांच्या विरोधात राज्यभर प्रतिक्रीया उमटल्या होत्या. शिवाय त्यांच्याच पक्षाचे नेते हाजी आराफत शेख यांनीही नितेश राणे यांच्यावर खालच्या भाषेत टिका केली होती. त्यानंतर आता खासदार नारायण राणे यांनी नितेश राणे यांचे ते वक्तव्य चुकीचे होते हे मान्य केले आहे. पण त्यांनी नितेश राणे यांची बाजू सावरण्याचाही प्रयत्न केला.

नितेश राणे हे एकमागून एक वादग्रस्त विधाने करत आहेत. त्यामुळे त्यांच्यावर टिकेची झोड उठत आहे. या पार्श्वभूमीवर आता खासदार नारायण राणे यांनी पहिल्यांदाच प्रतिक्रीया दिली आहे. नितेश राणे यांनी आत घुसून मारू असे जे काही वक्तव्य केले होते ते चुकीचे होते असं त्यांनी मान्य केले आहे. पण भारतात राहून देशाच्या विरोधी कृत्य करणाऱ्या लोकांच्या विरुद्ध देशातील किती मुस्लीमांनी आवाज उठवला आहे, असा प्रश्नही त्यांनी केला आहे. नितेश बोलला म्हणून त्याच्या विरुध्द आवाज उठवला जातोय. पण नितेशचे तोंड बंद केल, तर हजार नितेश राणे तयार होतील असेही नारायण राणे यावेळी म्हणाले. दरम्यान, यावेळी नारायण राणे यांनी शरद पवारांवर जोरादार टिका केली. शरद पवार हे चार वेळा मुख्यमंत्री होते. त्यावेळी त्यांनी काय केलं? त्यांनी महिलांवर होणारे अत्याचार का थांबले नाहीत. त्या वेळची यादी काढू का? असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. शिवाय ज्या वेळी तुम्ही मुख्यमंत्री होता त्यावेळी तुम्ही महिलांना पाच हजार का दिले नाहीत असा सवाल त्यांनी केला आहे. शरद पवारांनी लाडकी बहिण योजनेवर बोलताना महिलांच्या सुरक्षेचा प्रश्नही उपस्थित केला होता. त्याला राणे यांनी उत्तर दिले. यावेळी त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावरही जोरदार टिका केली. उद्धव ठाकरे यांना काही समजत नाही. मग ते मुख्यमंत्री



कसे होणार असे ते म्हणाले. अडीच वर्षे मुख्यमंत्री असताना त्यांनी काही केलं नाही केवळ फुकट मानधन घेतलं अशी टिका त्यांनी केली. यावेळी त्यांनी संजय राऊत यांनाही सोडले नाही. संजय राऊत यांना अक्कल नाही. उद्धव ठाकरे आणि संजय राऊत म्हणजे महाराष्ट्र नाही. त्यामुळे त्यांच्यावर अधिक काही बोलणार नाही असंही सांगायला ते विसरले नाहीत. आपल्याला पंतप्रधानपदाची ऑफर विरोधकांनी दिली होती, असा गौप्यस्फोट नितीन गडकरी यांनी केला होता. त्यावर नारायण राणे यांनी अधिक बोलणे टाळले. ते माझे चांगले मित्र आहेत. ते काय बोलले याबाबत आपल्याला काही कल्पना नाही. शिवाय त्या विषयावर आपल्याला काही बोलायचं नाही असंही राणे यावेळी म्हणाले. यावर बोलणे राणे यांनी टाळले. राणे मुख्यमंक्षी असताना गडकरी हे मंत्री होते.

## ईद-ए मिलाद निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

**। माणगाव । वार्ताहर ।**

प्रेषित मोहम्मद सर्वांसाठी, रक्तदान हे जीवनदान व सर्वश्रेष्ठ दान असून आपल्या रक्ताच्या एका थेंबाने एखाद्याचा जीव वाचू शकतो हि समाज सेवी भावना नजरेसमोर ठेऊन उम्मत-ए मुस्लिम कमिटी माणगाव यांच्यावतीने ईद-ए मिलाद-उन-नबी निमित्ताने शासकीय रुग्णालय अलिबाग रक्तपेढी यांच्या विशेष सहकार्याने रविवार २२ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत शासकीय विश्रामगृह जुने माणगाव या ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात जास्तीत जास्त रक्त दात्यांनी सहभाग घेऊन रक्तदान करावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

रक्त हे कृत्रिम रित्या तयार होत नाही तर नैसर्गिक रित्या तयार होत असते. मानवाला प्रसंगी मानवाच्याच रक्ताची गरज भासते. रक्तदान करणाऱ्या रक्तदात्याचे एकावेळी फक्त ३५० मिली एवढे रक्त घेतले जाते. रक्त दान हेच खरे सर्वश्रेष्ठ दान असून आपण केलेले रक्तदान हे २४ ते ४८ तासात भरून निघत असते. रक्त असे आहे की यामध्ये जात-पात पाहिली जात नाही. प्रेषित मोहम्मद पैगंबर यांनी जगाला शांतीचा संदेश दिला. त्यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. प्रेषित मोहम्मद पैगंबर यांचा जन्म दिवस म्हणून ईद-ए मिलाद साजरी केली जाते. या ईद निमित्त माणगाव तालुक्यातील मुस्लिम बांधवानी एकत्रित येत आपण समाजाचे काहीतरी देणेकरी लागतो हा उद्देश नजरेसमोर ठेऊन सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

१९ सप्टेंबर

१) श्रीम. सुषमा शशिकांत राऊत चेंढरे, १९-९-१९४९

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**विमल सॉ मिल, उचेडे, पेण**
**मिलन क्लॉथ सेंटर, अलिबाग**
**१८-९-२०२४**



**कै. वसंत नाना म्हात्रे, बामणोली, अलिबाग**

**इद्रनील पोतनीस, वाढदिवस अलिबाग**
**कै. गजानन दामोदर चंदने, स्मरणार्थ, एवरग्रीन हाऊस, अलिबाग**
**१९-९-२०२४**

## अंगणवाडीतील मुलांना शालेय गणवेश वाटप

**। रसायनी । वार्ताहर ।**

संवेदना डेव्हलपमेंट फाउंडेशनच्या सन्मवयाने आणि डॉ. विदुला सोमण यांच्यातर्फे अंगणवाडीतील ३२ मुलांना शालेय गणवेश, दफ्तर आणि खाऊचे वाटप करण्यात आले.



सुरुवातीला अंगणवाडी सेविका आशा माळी यांनी डॉ. विदुला सोमण, मोहिनी बागडे आणि इंदू खुडे यांचे पुष्पगुच्छ आणि शाल व श्रीफळ देऊन स्वागत केले. त्यानंतर संवेदना डेव्हलपमेंट फाउंडेशनच्या मोहिनी बागडे यांनी मुलांना चांगल्या सवयी आणि गुड टच बॅड टच विषयी मार्गदर्शन केले. याविषयी बोलताना मुलांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाला वावेघर अंगणवाडी सेविका आशा माळी, मदतनीस इंदू माळी, वावेघरमधील समाजसेविका इंदू खुडे, डॉ विदुला सोमण आणि मोहिनी बागडे यांच्यासह काही पालकांची सुध्दा उपस्थिती होती. पालकांनी या उपक्रमाचे कौतुक करत धन्यवाद दिले.

## खाडीवरील साकव आले मोडकळीस

### ■ नवे रुंद पूल बांधण्याची वैजनाथ ठाकूर यांची मागणी

**। उरण । वार्ताहर ।**

तालुक्यातील धुतुम गावाजवळ असलेले धुतुम बैलोंडा खाडीवर (नांदोरा) बांधलेला जुना साकव (पायवाट) तसेच दिघोडे उघडीवरील साकव नादुरुस्त होऊन मोडकळीस आलेले असून सिडकोच्या माध्यमातून जुन्या साकवच्या जागी नवीन पूल बांधण्यात यावेत, अशी मागणी जिल्हा परिषद माजी सदस्य कुंदा ठाकूर, वैजनाथ ठाकूर यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी रायगड, जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती उरण, सिडको प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग आदी ठिकाणी पत्रव्यवहार करून केली होती.

धुतुम येथील सदर पूल जूने झाले आहेत. शिवाय रहदारीच्या दृष्टीने हे साकव निकृष्ट दर्जाचे झाले आहेत. येथे अजूनही पायवाट असल्यामुळे नागरिकांना अनेक संकटाना सामोरे जावे लागत आहे. दिघोडे येथे प्राथमिक आरोग्य केंद्र असल्याने धुतुम गावातील लोकांना दोघोडे येथे जाण्यासाठी सुलभ रस्ता तयार होईल. किंवा दिघोडे येथील नागरिकांना धुतुम येथे सुलभपणे जाता येईल. शिवाय धुतुम गावात आयओटीएल ही ज्वलनशील पदार्थची कंपनी कार्यरत आहे. येथे भविष्यात एखादी आग लागली तर फायर ब्रिगेडच्या वाहनांना किंवा ॲम्ब्युलन्स आदी वाहनांना येण्या जाण्यासाठी योग्य रस्ता नाही. त्यामुळे भविष्यात खूप मोठा धोका निर्माण झाल्यास सुसज्ज असे नवीन पूल, नवीन रस्ते असणे गरजेचे आहेत. हा पूल तयार झाल्यास दिघोडे येथील मच्छिमार करणाऱ्या कोळी बांधवांना तसेच जहाज बांधणीचे काम करणाऱ्या कामगारांना याचा खूप मोठया प्रमाणात फायदा होणार आहे. काही महिन्या पूर्वी पुलावर दोन व्यक्तींचा मृत्यू झाला होता. त्यामुळे अशी दुर्घटना परत होऊ नये, भविष्यात कोणतेही दुर्घटना होऊ नये तसेच जनतेचे हित लक्षात घेउन नागरिकांचा प्रवास सोप्पा व्हावा, सकाळी नागरिकांना चालण्यासाठी रस्ता उपलब्ध व्हावा यासाठी माजी जिल्हा परिषद सदस्य वैजनाथ ठाकूर यांनी जूना साकव (पूल) पाडून त्या जागी नविन पूल बांधावे व हे काम जिल्हा परिषदकडे वर्ग करावे अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे.

## अरुंद रस्त्यामुळेच बसला अपघात

**वेंगुर्ले :** तुळस येथे खासगी बसला झालेला अपघात हा अरुंद रस्त्यामुळे झाल्याचा आरोप तेथील ग्रामस्थांनी केला आहे. याबाबत वारंवार सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्रव्यवहार करूनही हा रस्ता रुंदीकरण केला जात नसल्याने ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

अपघात झालेल्या ठिकाणचा रस्ता हा अतिशय अरुंद आहे. या रस्त्याला पुरेशी बाजूपट्टी नाही. दोन मोठ्या बस एकचवेळी या रस्त्यावरून जाऊ शकत नाहीत. या रस्त्याच्या दोन्ही बाजूला भातशेती आहे. अपघातादिवशी या अरुंद रस्त्यावर बस आली असता समोरून येणाऱ्या रिक्षाला बाजू देण्यासाठी चालकाने गाडी बाजूपट्टीवर उतरवली. याचवेळी ही बस जास्तच बाहेर गेल्याने बाजूच्या शेतात कोसळली.

हा अरुंद रस्ता सावंतवाडी-वेंगुर्ले मुख्य मार्गावर असल्याने याचे रुंदीकरण होणे गरजेचे आहे. याबाबत तुळस ग्रामपंचायत, ग्रामस्थांनी वेळोवेळी सार्वजनिक बांधकाम विभागाला कळवूनही याकडे लक्ष दिले जात नसल्याने ग्रामस्थांकडून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

## उरणमध्ये गाव तेथे काँग्रेस उभी करण्याचा शुभारंभ

**। उरण । वार्ताहर ।**

भारतीय काँग्रेस कमिटीच्या अंतर्गत गाव तेथे काँग्रेस उभी करण्याचा संकल्प काँग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी, प्रदेश अध्यक्ष नाना पाटोळे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हा काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी अंगीकारला असून त्याची सुरुवात ही दिघोडे गावातून केली.



गावा गावात काँग्रेसला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून बुधवारी (दि. १८) या संकल्पेचा दुसरा टप्पा म्हणून काँग्रेस पक्षाच्यावतीने जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी भेंडखळ गावातील गाव तेथे काँग्रेस या नामफलक अनावरण सोहळ्याच्या माध्यमातून मोठ्या धुमधडाक्यात पुन्हा एकदा सुरू केला आहे.

यावेळी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी सांगितले की, काँग्रेस पक्षाने देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देण्याचे काम केले आहे. त्यामुळे काँग्रेस पक्षाची विचारधारा ही सर्वसामान्य माणसाच्या हृदयात घर करून आहे. प्रकल्पग्रस्तांचे नेते दि.बा.पाटील यांनी भूमीपुत्रांना न्याय मिळवून देण्यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत लढा उभारला. अशा प्रकल्पग्रस्तांचे आधारस्तंभ असलेल्या लोकनेते दि.बा.पाटलांच नाव नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला मिळून देणे हे काँग्रेसबरोबर या परिसरातील प्रकल्पग्रस्तांचे काम आहे. आज जेएनपीएचा फंड उरण तालुक्यातील गावांना मिळत नाही, ही शोकांतिका आहे. गोपाळ पाटील यांनी उरणचा आमदार निवडून यावा म्हणून पुढाकार घेतला. परंतु उरणकरांचे प्रश्न जैसे थे प्रलंबित राहिले, असे शेवटी महेंद्र घरत यांनी नमूद करून जनमानसांचे प्रश्न सोडविण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पुढाकार घेणे गरजेचे असल्याचे शेवटी स्पष्ट केले. गाव तेथे काँग्रेस या माध्यमातून उरण विधानसभा मतदार संघातील भेंडखळ, नवघर, पागोटे, जसखार, सोनारी, करळ, फुंडे, पाणजे, डोंगरी, बोकडविरा, नवीन शेवा, द्रोणागिरी नोडसह इतर महालण विभागातील गावात काँग्रेस प्रदेश सरचिटणीस तथा रायगड प्रभारी श्रीरंग बरगे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षाच्या नामफलकांचे अनावरण करण्यात आले.

यावेळी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सदस्य मिलिंद पाडगावकर, जे.डी.जोशी, काँग्रेस जिल्हा सरचिटणीस महेंद्र ठाकूर, उरण तालुकाध्यक्ष विनोद म्हात्रे, शहर अध्यक्ष प्रकाश पाटील, उरण तालुका युवक अध्यक्ष लंकेश ठाकूर, माजी शहराध्यक्ष किरिट पाटील, श्रीयश घरत, विधणे विभाग अध्यक्ष बी एन ठाकूर, काँग्रेस पक्षाचे तालुका सरचिटणीस अश्विन कैलास थळी, महिला अध्यक्षा रेखा घरत, आजी माजी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून जेष्ठ पत्रकार घनश्याम कडू यांनी उरणकरांसाठी रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्याची महेंद्र घरत यांच्याकडे मागणी केली.



## आरएसपी विद्यार्थ्यांनी राबविले स्वच्छता अभियान

**। उरण । वार्ताहर ।**

जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटचे एनआय उरण या शाळेमधील आरएसपी विद्यार्थी व स्काऊट गाईड विद्यार्थी यांनी उरण नगर परिषदेच्या विमला तलाव गार्डन येथे मोठया प्रमाणात साफसफाई केली. दहा दिवसांच्या गणपती मूर्तीचे विमला तलाव गार्डनमधील तलावात विसर्जन झाले. यावेळी मोठया प्रमाणात कचरा निर्माण झाला. त्यामुळे विमला तलाव येथे अस्वच्छ झालेला परिसर स्वच्छ करण्यासाठी जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटचे एनआय उरण या शाळेमधील आरएसपी विद्यार्थी व स्काऊट गाईड विद्यार्थी यांच्या माध्यमातून स्वच्छता अभियान राबविण्यात आले. तलाव व आजूबाजूच्या परिसरातील कचरा उचलून साफ सफाई करण्यात आली. शाळेतील शिक्षक सोमीनाथ खरमाटे व मुकद्दर तडवी या उपक्रमात विद्यार्थ्यांसोबत होते.

## कोकण रेल्वेत १९० जागांची भरती

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडमध्ये १९० जागांसाठी १६ सप्टेंबरपासून अर्ज मागिवले जात आहेत. ही भरती प्रक्रिया ऑनलाईन असून महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटकातील पात्र उमेदवार अर्ज करू शकतात.

कोकण रेल्वेच्या जाहीरातीनुसार, या भरती अंतर्गत वरिष्ठ विभाग अभियंता, सहाय्यक लोको पायलट, वरिष्ठ विभाग अभियंता, ट्रॅक मेंटेनर, स्टेशन मास्टर, गुड्स ट्रेन मॅनेजर, पॉईंट मॅन आणि सिग्नल अँड टेलिकम्युनिकेशन आणि वाणिज्य विभागात विविध पदांसाठी उमेदवारांची निवड केली जाईल. या भरतीसाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख ६ ऑक्टोबर २०२४ आहे. तरुणांसाठी रेल्वेत नोकरीची सुवर्णसंधी आहे.

### या उमेदवारांना प्राधान्य

**ज्या उमेदवारांची जमीन केआरसीएल प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली आहे. ते या पदांसाठी अर्ज करू शकतात. जमीन गमावणाऱ्यांची पत्नी किंवा पती, मुलगा, मुलगी, नातू आणि नात देखील पात्र आहेत. या उमेदवारांना निवड प्रक्रियेत पहिली पसंती मिळणार आहे. तसेच महाराष्ट्र, गोवा किंवा कर्नाटकमध्ये रहिवासी असलेल्या आणि कोकण रेल्वे मार्गावरील एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजमध्ये नोंदणीकृत वैध रोजगार विनिमय कार्ड असलेल्या उमेदवारांना भरती मोहिमेत दुसरी पसंती मिळेल. केआरसीएल संस्थेत किमान तीन वर्षे नियमित सेवा पूर्ण केलेले कर्मचारीही या नोकरीसाठी पात्र ठरतील. वरील पात्रता अटींची पूर्तता करणारे आणि १ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते ३६ वर्षे वयोगटातील उमेदवार या पदांसाठी अर्ज करू शकतात. कोविड-१९ महामारीमुळे वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांना दिलासा देण्यासाठी कमाल वयोमर्यादा ३३ वरून ३६ करण्यात आली आहे. राखीव प्रवर्गातील उमेदवारांना वयोमर्यादेत आणखी सूट देण्यात येणार आहे. अधिक माहिती जाणून घेण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी कोकण रेल्वेच्या अधिकृत वेबसाईट पाहावी.**

## विश्वकर्मा पुजा उत्साहात साजरी

**। सुकेळी । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील नागोठणे जवळच असलेल्या ऐनघर ग्रामपंचायत हद्दीमध्ये येणाऱ्या कंपन्यांमध्ये मंगळवार (दि.१७) रोजी विश्वकर्मा पुजा उत्साहात संपन्न झाली.

येथील महाराष्ट्र सिमलेस लिमिटेड, विभोर, जिंदाल सॉ, रायगड प्लास्टिक, जिंदाल ड्रींलिग अशा पाच ते सहा कंपन्यांमध्ये विश्वकर्मा पुजा उत्साहमय वातावरणात संपन्न झाली.

येथिल काही कंपन्यांमध्ये विश्वकर्मा मुर्तीचे तर काही ठिकाणी विश्वकर्मा फोटोंची पुजा करण्यात आली. त्यानंतर कंपनीमधिल मशनरींचे देखिल विधिवत पुजण करण्यात आले.

या विश्वकर्माच्या पुजेच्या वेळी नेहमीच कामावर व्यस्त असलेल्या सर्वच कामगारांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद पहावयास मिळाला. दुपारी-रात्री सर्वांना अन्नप्रसाद देण्यात आले. त्याचा लाभ सर्वांनी लाभ घेतला.

## मुख्यमंत्री ‘माझी शाळा सुंदर शाळा’ उपक्रमात उसर शाळा द्वितीय

**। माणगाव । वार्ताहर ।**

महाराष्ट्र शासनाने आयोजित केलेल्या शैक्षणिक वर्षे २०२४-२५ या वर्षी मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा दोन या स्पर्धेत छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचलित अभिनव ज्ञान मंदिर उसर खुर्द, ता. तळा या विद्यालयाने माध्यमिक स्तरावर तळा तालुक्यात द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे.



सलग दुसऱ्या वर्षी विद्यालयाने ही किमया केली असून विद्यालयाच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. शैक्षणिक, सामाजिक उपक्रम, विध्यार्थी गुणवत्ता, सुसज्ज इमारत व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी शाळा विविधांगी उपक्रम राबवित असते. विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल सलग १३ वर्षे १०० टक्के लागत आहे. विद्यालयाच्या या बाबिंबरोबरच केंद्रस्तर समिती, तालुका समितीने शाळेतील भौतिक सुविधा, विद्यार्थ्यांची गुणवत्ता, शासकीय अभिलेख क्रीडा, सांस्कृतिक, शिक्षक गुणवत्ता, शैक्षणिक पात्रता वाढ, शासकीय विद्यार्थी लाभाच्या योजना आदी मानके तपासली व गुणांकन केले. या सर्व बाबीत शाळा अव्वल ठरली. रुपये दोन लाख रोख रकमेचे हे पारितोषिक आहे. संस्थेचे सरचिटणीस डॉ. निलेश रेवगडे, शालेय समितीचे अध्यक्ष किशोर अल्हाट, कार्याध्यक्ष श्रीकांत तरटे, उपकार्याध्यक्ष विश्वास सोनवणे, शालेय समिती सदस्य विजय सावंत, सरपंच, सदस्य, जिल्हा परिषद माजी सदस्या गीता जाधव, माजी समाज कल्याण सभापती हिराचंद तांबे, विद्यालयाचे माजी विद्यार्थी ॲड. उत्तम जाधव यांनी अभिनंदन केले आहे.

### महात्मा गांधी विद्यालयाच्या नूतन इमारतीचे करणार उद्घाटन

# खासदार शरद पवार 22 सप्टेंबरला कराडमध्ये

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

कराड तालुक्यातील काले येथील लोक सभागातून उभारण्यात आलेल्या महात्मा गांधी विद्यालयाच्या नुतन इमारतीचा उद्घाटन समारंभ रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व खासदार शरद पवार यांच्या हस्ते व विविध पदाधिकारी यांच्या उपस्थितीत रविवारी २२ सप्टेंबर रोजी दुपारी तीन वाजता संपन्न होत आहे. तरी या कार्यक्रमाला सर्व रयत शिक्षण प्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

काले येथे पद्मभूषण डॉ कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ४ आक्टोबर १९१९ मध्ये शिक्षणाचा श्रीगणेशा व रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून पहिले वसतीगृह सुरू केले. तर १ ऑगस्ट १९४८ रोजी शाळेची स्थापना करण्यात आली. विद्यालयाच्या नूतन इमारतीचे बांधकाम लोकसहभागातून करण्यात आले आहे.

२०१९ मध्ये बांधकामाला सुरुवात झाली होती. रविवारी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३७ व्या जयंतीनिमित्ताचे औचित्य साधून त्याच दिवशी विद्यालयाच्या प्रांगणात दुपारी तीन वाजता संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते उद्घाटन सोहळा संपन्न होत आहे. संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. तसेच संस्थेचे संघटक डॉ. अनिल पाटील, माजी खासदार श्री निवास पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ज्ञानदेव मस्के, संस्थेचे व्हा. चेअरमन भगीरथ शिंदे, संस्थेचे सचिव विकास देशमुख , विभागीय चेअरमन संजीव पाटील यांच्यासह संस्थेचे विविध पदाधिकारी यावेळी उपस्थित राहणार आहेत.

तरी सातारा जिल्ह्यातील रयत शिक्षण संस्थेचे सर्व आजी-माजी विद्यार्थी देणगीदार हितचिंतक यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन प्रभारी मुख्याध्यापक राजेंद्र नांगरे-पाटील व स्थानिक स्कूल कमिटी, शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक पालक संघ, माता पालक संघ, सरपंच व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ यांनी केले आहे.

### इमारत बांधकाम निधी

**राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टच्यावतीने सुमारे एक कोटी रुपयांचा निधी शरद पवार यांनी इमारत बांधकामासाठी दिला आहे. तसेच रयत शिक्षण संस्थेकडुन ५५ लाख रुपये, सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज कराड यांनी वीस लाख रुपये तसेच रयत शिक्षण संस्थेचे व महात्मा गांधी विद्यालयाचे आजी-माजी विद्यार्थी, रयत सेवक, शिक्षक, हितचिंतक व शालेय बाल गोपाळांनी आपल्या खाऊचे पैसे असे मिळून सुमारे ७२ लाख रुपयांचा निधी दिला आहे. या सर्व निधीतून सुमारे २ कोटीहून अधिक रकमेची भव्य दिव्य अशी शाळेची इमारत उभारण्यात आली आहे.**

● मुंबई गिरगाव चौपाटी येथील १० दिवसांच्या गणेशाच्या विसर्जन वेळीचे गर्दीचे क्षण. (छायाचित्र- सुधीर नाझरे)





● अलिबागमधील अनंत चतुर्दशीच्या गणपती बाप्पांचे विसर्जन मंगळवारी 'गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर' अशा जयघोषात तसेच वाजतगाजत, नाचत मिरवणूक काढून करण्यात आले.
(छायाचित्र- समीर मालोदे)

# मुरूड परिसरात गणेशोत्सवाची सांगता

**। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।**

मुरूड परिसरात गणरायाचा जयघोष करीत मंगळवारी (दि.१७) गणेशोत्सवाची सांगता करण्यात आली. यावेळी मुरूड परिसरातील समुद्रकिनारी आणि नदीमधून सुमारे २ हजार गणेश मूर्तींचे शांततेत विधिवत विसर्जन झाल्याची माहिती पोलीस सूत्रांकडून देण्यात आली आहे. मुरूड नगरपरिषद कर्मचाऱ्यांनी समुद्रकिनारी विसर्जन मार्गावर स्वागत फलक, पथ दिवे, विद्युत रोषणाई, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, जीवरक्षक, निर्माल्य संकलन कलश, मार्गदर्शक कर्मचारी आदींची व्यवस्था केली होती. तसेच, २५० पेक्षा अधिक पोलीस, एसआरपी आणि सुरक्षा बलाचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

याआधी गौरी-गणपती विसर्जन दिवशी मिरवणुकीवर दोन मुस्लिम मुलांनी दगड मारल्याने मुरूड परिसरात वातावरण कलुषित झाले होते. अधिक अनुचित प्रकार वाढू नये यासाठी मुरूड शहरातील जुनी पेठ, दत्तवाडी, भोगेश्वर आळी, बाजारपेठ, गणेश आळी, पेठ मोहल्ला, लक्ष्मी खार आदींसह संवेदनशील भागात अलिबाग विभागीय पोलीस अधिकारी विनीत चौधरी, मुरूड पोलीस निरीक्षक उदय झावरे, उपनिरीक्षक अविनाश ढाकरे, मकरंद पाटील, प्रशांत लोहार, विक्रांत बांधणकर यांच्यासह पोलिस कर्मचाऱ्यांनी रुट मार्च काढला असून शांतता राखावी असे आवाहन करण्यात आले होते. तसेच, विसर्जन सोहळ्यादरम्यान बाजारपेठ ठिकाणी अलिबाग उपविभागीय पोलिस अधिकारी विनित चौधरी, मुरुड तहसीलदार रोहन शिंदे हे शहरात प्रत्येक ठिकाणी मिरवणूकीवर लक्ष ठेवून होते. यावेळी, पोलिस निरीक्षक नामदेव बंडगर, पोलिस उपनिरीक्षक दिपक राऊळ, पोलिस नाईक किशोर बढारे यांच्यासह आरसीपीच्या ३० अंमलदारांचा बाजारपेठेत बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## गणेशभक्तांमध्ये लक्षणीय उत्साह

**घरगुती गणेशोत्सव ही मुरुड तालुक्याची परंपरा आणि खासियत असल्याने गणेश दर्शन घेण्यासाठी चारमानी आणि स्थानिक नागरिक, ग्रामस्थांची वर्दळ गावागावातून दिसत होती. खारआंबोली, शिघ्रे, जोसरांजन, वाणदे, उंडरगाव, शिघ्रे नवी वाडी, विहूर, नांदगाव, मजगाव, बोर्ली, बारशिव, आदाड, वावे एकदरा, राजपुरी, डोंगरी, आगरदांडा, उसडी, सावली, जमृतखार, टोकेखार, मिठागर, दांडे, काशीद, सर्वे, उसरोली आदी गावांतून गणेशोत्सवाचा उत्साह लक्षणीय होता.**

## श्रीसदस्यांकडून बाप्पांचे पुनर्विसर्जन

**कोर्लई :** मुरुड समुद्रकिनारा व एकदरा खाडीतून सुमारे ८३ प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या गणपतीचे श्रीसदस्यांनी पुनर्विसर्जन केले आहे. पहाटे पाच वाजल्यापासून सुमारे २५ ते ३० श्रीसदस्यांनी खाडीमध्ये विसर्जित केलेले प्लास्टर ऑफ पॅरिसचे गणपती काढण्यास सुरुवात केली होती. दोन तासांच्या अथक प्रयत्नाने मुरुड समुद्रकिनारा व एकदरा खाडीतून ८५ प्लास्टर ऑफ पॅरिसचे गणपतीच्या मूर्ती मिळाल्या आहेत. मुरुडमधील श्रीसदस्य दरवर्षी या खाडीतील प्लास्टर ऑफ पॅरिसचे गणपती काढून खोल समुद्रात नेऊन विसर्जित करीत आहेत. याही वेळेला हे सर्व गणपती बोटीच्या साहाय्याने परिसरातील खोल समुद्रात नेऊन विसर्जन करण्यात आले. मुरुड समुद्रकिनारा व एकदरा खाडी उथळ असल्याकारणाने पाण्याच्या ओटीला हे सर्व गणपती वरती येत असतात. या मूर्तींचे विटंबना होऊ नये या उद्देशाने हे श्रीसदस्य ही सेवा करीत असतात.



# 'रुढी परंपरांची सांगड घालणारा गणेशोत्सव'



**। उरण । वार्ताहर ।**

हल्ली मोठ्या प्रमाणात परिवारात कोणत्या ना कोणत्या कारणाने दुरावा निर्माण होत चालला आहे. मात्र, पाणदिवे गावातील नरेश मोकाशी यांच्या कुटुंबीयांनी आपल्या घरातील १० दिवसांच्या गणेशोत्सवात रुढी परंपरांची सांगड घालून विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून आपल्या कुटुंबाला एका छत्राखाली आणून ठेवण्याचे काम केले आहे. असे प्रतिपादन मा. आमदार मनोहर भोईर यांनी पाणदिवे गावातील नरेश मोकाशी कुटुंबाच्या गणेशोत्सवाप्रसंगी दर्शन घेताना व्यक्त केले. यावेळी मोकाशी कुटुंबांनी मोठ्या भक्तिभावाने वाजत गाजत, फटाक्यांच्या आतषबाजीने आपल्या दहा दिवसांच्या गणेशाला वंदन करून मोठ्या अंतःकरणाने निरोप दिला.

# भुवनेश्वरच्या राजाला भावपूर्ण निरोप

**। सुकेळी । वार्ताहर ।**

रोहा येथील जय गणेश मित्र मंडळाच्या भुवनेश्वरच्या राजाला भावपूर्ण अंत:करणाने ढोल-ताशांच्या गजरात निरोप देण्यात आला. यावर्षीचे या मंडळाचे २४ वे वर्षे होते. या दहा दिवसांमध्ये मंडळातर्फे विविंध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मिरवणूक सोहोळा पार पाडण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष नितीन माने, उपाध्यक्ष प्रविण शिर्के, सचिव दिपेश महाडीक, उपसचिव प्रथमेश घाग, खजिनदार महेश शिर्के, उपखजिनदार उमेश नाईक, तसेच जय गणेश मित्र मंडळाच्या सर्वच सदस्यांनी मेहनत घेतली होती.






# चिमुकल्यांना अश्रू अनावर

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

पाताळगंगा परिसरातील विविध ठिकाणी गणपती विसर्जनासाठी लहान मुलांपासून वृद्ध या ठिकाणी एकत्र आले होते. यावेळी चिमुकल्यांना अश्रू अनावर झाल्याचे पाहायला मिळाले. तसेच, लहान मुलांसह उपस्थित सर्व भक्तांनी गणपती विसर्जनाला टाळ-मृदुंगांच्या तालावर भजन म्हणत गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यात आला.



● अलिबाग तालुक्यातील श्रीगाव येथे दहा दिवसाच्या गणपती बाप्पाचे विसर्जन करताना गणेशभक्त.

## आगारात बाप्पाचे भक्तिभावाने विसर्जन

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

श्रीवर्धन आगाराची स्थापना १९८७ साली झाली. तेव्हापासून श्रीवर्धन बसस्थानकात गणपतीची प्रतिष्ठापना केली जाते. ३७ वर्षाच्या परंपरेप्रमाणे श्रीवर्धन आगाराच्या गणपतीचे विसर्जन अनंत चतुर्दशी दिवसाला केले गेले. यावेळी 'पुढच्या वर्षी लवकर या' असे बाप्पाला आवाहन करत भक्तीभावाने विसर्जन करण्यात आले.



# बाप्पाला भक्तिमय वातावरणात निरोप

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

दहा दिवसांच्या गणपती बाप्पांच्या विसर्जनाला पावसाने मोठी विश्रांती घेतली होती. यामुळे खांब, देवकान्हे विभागातील सार्वजनिक आणि घरगुती बाप्पांचे विसर्जन गणेश भक्तांनी बाप्पाचा जयजयकार करत 'गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या अशा जय घोषात भक्तिमय वातावरणात वाजत-गाजत भक्ती भावनेने निरोप देण्यात आला. तसेच, यावेळी हरिनामाचा गजर करत मोठ्या प्रमाणात गुलालाची उधळण करण्यात आली होती.



## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● घरात घरकाम व मुलाची देखभाल करण्यासाठी केअर टेकर पाहिजे आहे. ठिकाण नागाव. कामाची वेळ सकाळी ९ ते संध्याकाळी ६ , पगार १००००. संपर्क- ७८७५८५६५५५.

● घरकाम व मुलांना सांभाळणेसाठी बाई हवी आहे. ठिकाण : पंतनगर अलिबाग येथे पूर्णवेळ राहणारी किंवा सकाळी ७-३०/८ ते ५ संपर्क :९८६७२१५४९५/९४२२३७५१२४

● रिसॉर्ट वर कामासाठी जोडपं पाहिजे आहे. संपर्क- ९६०७१०२३५७, ठिकाण- सासवणे.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१



# कर्जत तालुक्यात उत्साहात विसर्जन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात अनंत चतुर्दशीपर्यंत स्थापित झालेल्या गणेश मूर्तींचे विधिवत विसर्जन करण्यात आले. तालुक्यात सर्वत्र शांततेत गणेश विसर्जन सोहळे पार पडले असून कर्जत नगरपरिषदेने उल्हास नदीवरील गणेश घाट, नेरळ ग्रामपंचायतीने ब्रिटिश कालीन धरणावरील गणेश घाट आणि दहीवली ग्रामपंचायतीच्यावतीने उल्हास नदी मालेगाव-दहीवली पुल येथे विसर्जन सोहळ्याचे आयोजन केले होते.

# गणरायाला भक्तिमय निरोप



**रसायनी :** मोहोपाडा रसायनीतील दहा दिवसांच्या बाप्पाचे विसर्जन करताना पावसाने उसंत घेतल्याने मोहोपाडा तलाव, पाताळगंगा नदी, रिस पुल, वावेघर घाट, गुळसुंदे आदि ठिकाणी वाजतगाजत भक्तिमय वातावरणात गणरायाला भावपुर्ण निरोप देण्यात आला.

# भिवंडीमध्ये गणेश विसर्जन मिरवणुकीवर दगडफेक

**भिवंडी :** गणेश विसर्जन मिरवणुकीवर दगडफेक झाल्याने मंगळवारी रात्री उशिरा भिवंडीत तणाव निर्माण झाला होता.या घटनेमुळे संतप्त झालेल्या गणेश मंडळांनी हा प्रकार करणाऱ्यांना अटक करण्याची मागणी करत विसर्जन मिरवणूक जागेवर थांबवण्याचा निर्णय घेतला होता. पण यानंतर पोलिसांनी हस्तक्षेप करत विसर्जन मिरवणूक मार्गस्थ केली. यावेळी पोलिसांना जमावाला पांगवण्यासाठी लाठीमारही केला, ज्यामध्ये अनेक जखमी झाले आहेत. अतिरिक्त पोलीस आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण यांनी या प्रकरणी माहिती देताना सांगितले की, गणपती विसर्जन मिरवणुकीत घडलेल्या घटनेनंतर मिरवणूक शांततेत पुढे गेली. मात्र, दगडफेक झाल्यानंतर परिस्थिती चिघळली होती. त्यामुळे काही लोकांमध्ये वाद आणि बाचाबाची झाली व तणाव निर्माण झाला. परिस्थिती आता नियंत्रणात आहे, आणि हा प्रकार करणाऱ्यांचा कारवाईसाठी शोध घेण्यात येत आहे.

---

**महाराष्ट्र शासन**
**महसुल व वनविभाग**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालय, तळा जि.रायगड**
दुरध्वनी क्रमांक - ०२१४०-२६९३१७ फॅक्स-२६९०४२
Email ID -tahasiltala@gmail.com

क्र. प्रशासन/कात-५/जन्ममृत्यू/जाहिर नोटीस/२८३६/२०२४ दि.२२/०८/२०२४

**जाहिर नोटीस मसुदा**

श्री. अनंता नथुराम बटावले — अर्जदार
रा. शेनाटे, ता. तळा जि. रायगड

विरुध्द

१. गृप ग्रामपंचायत वानस्ते ता. तळा जि. रायगड. — सामनेवाला
२. निबंधक जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी
गटविकास अधिकारी पंचायत समिती तळा

तमाम जनतेस या जाहिर नोटीस अन्वये कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार यांनी त्यांचे वडील कै.नथुराम विठोबा बटावले यांचा मृत्यू दि.१३/०७/२०१४ रोजी मौजे शेनाटे, ता. तळा, जि. रायगड येथे झाला असून त्यांचे मृत्यूची नोंद सामनेवाल्यांचे कार्यलयीन अभिलेख सदरी नसल्यामुळे सामनेवाल्यानी तसा दाखला अर्जदार यांना दि.१३/०७/२०१४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांचे वडील कै.नथुराम विठोबा बटावले यांचा मृत्यू दि.१३/०७/२०१४ रोजी मयत झाले असल्याचे घोषीत करुन मृत्यू दाखला आदेश मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळविण्यात यावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे वडील कै.नथुराम विठोबा बटावले यांचा मृत्यू दि.१३/०७/२०१४ रोजी मौजे शेनाटे येथे झाला असल्याचे गृहित धरुन सदर प्रकरणी पुढील योग्य तो आदेश पारीत केला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक. २२ ऑगस्ट, २०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

सही/-
**(स्वाती पाटील)**
**कार्यकारी दंडाधिकारी तळा**

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे पाझर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाचे मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| पाझर ता. अलिबाग | ४५७ | जिरायत ० १६-१० पो.ख. क्षेत्र ०-००-९० एकुण क्षेत्र ०-१७-०० | ४.३२ |

वर वर्णन जमिन मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत ही विद्यमान मालक आशिष अच्युत पाटील, भालचंद्र केशव पडते, यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक - १८/०९/२०२४
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु. बुरूमखाण पो. वरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड,

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते कि, माझ्या अशिलांनी मौजे- कावीर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील श्री. रामचंद्र हरी मानकर, वगैरे रा. किहीम यांच्या खुद्द मालकीची खालील वर्णनाची जमीन मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे-कावीर, ता. अलिबाग येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ६४ क्षेत्र ०-३३-३० हे.आर, आकार रु.७.९४ पैसे या भातशेती मिळकती पैकी श्री. रामचंद्र हरी मानकर यांचे क्षेत्र ०-१४-१० हे. आर, पो. ख ०-०२-५५ हे. आर, एकूण क्षेत्र ०-१६-६५ हे. आर.

तरी वर वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालकांचे ताबे कब्जा वहिवाटीत, निर्वेध, बोजा विरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकतीसंदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हित संबंध असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ दिवसांचे आत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा संदर्भित मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग
दिनांक :-१८/०९/२०२४

सही / -
**ॲड, ऋग्वेद अविनाश ठाकूर.**
रा. ५/३, आत्माराम नगर
अलिबाग- रायगड
मोबा.नं. ९८५००९०१०३

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे हालिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालक श्री. महेंद्र बबन चंदन यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| २४ | १६ | ०-०६-०० | ०-०६ |
| २६ | ६ | ०-१५-४० | ०-०९ |

सबब सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, लिज, लिन, बक्षीस, करार, ताबेकब्जा, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्य तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि. १९/०९/२०२४.

**ॲड.सतीश धर्मा डायरे,**
पत्ता- ००२, शिवतीर्थ, सहयोग
को.ऑ.हौ.सो.ब्राम्हण आळी,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
मो.९८५०४०२६५७.

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)**

ज.म. र अर्ज ३३/२०२३

प्रति,
श्री. धिरज कृष्णकांत म्हात्रे
मु. १-२ वेताळ प्रसाद चाळ, — अर्जदार
रेतीबंदर, क्रॉस रोड
निळकनटेश्वर चाळसमोर, मोठागाव,
डोंबिवली (प) ठाणे ४२१२०२

विरुध्द

ग्रुप ग्रामपंचायत वैजाळी, हाशिवरे, — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,
१.अर्जदार हे डोंबिवली येथील रहिवाशी आहेत. अर्जदार यांचे वडील कै. कृष्णकांत धर्माजी म्हात्रे यांचा मृत्यु दि २१/४/२००३ रोजी ग्रामपंचायत वैजाळी - हाशिवरे येथील वैजाळी येथील राहत्या घरी झाला होता.
२.मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत वैजाळी-हाशिवरे येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत वैजाळी - हाशिवरे यांना करणेकरीता न्यायलयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन दि. १८/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि.१८/१०/२०२४ रोजी माझी सही न्यायलयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग
तारिख : १८/०९/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल १) अनिल महादेव भोसले, २) प्रणिता अनिल भोसले दोघेही रा. सुदर्शन नगर, डोंबिवली पूर्व जि.ठाणे ४२१२०१ यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे विद्यमान मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे-हुमगाव, तालुका-कर्जत, जि.-रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| श्री अमर अरविंद रेड्डी | ६१ | ६ | ०.१९.७० | १.३४ |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तदंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त , साठेकरार, मृत्युपत्रांकित दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०८ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दि. १९/०९/२०२४

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. लक्ष्मण धर्मराज जाधव**
पत्ता. मार्बल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं. २४,
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९२११३६६/७७०९१६०५६७

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविणेत येते की, मौजे देऊळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती जमिनीची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक व कब्जेदार श्री. विनय वामन जोशी व सौ. मेधा विनय जोशी यांचेकडुन आमचे अशिलांनी कायम खरेदी घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे रेव्हेन्यु रेकॉर्ड प्रमाणे वर्णन खालीलप्रमाणे.

मौजे देऊळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती मिळकत

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|
| ६७ | २/अ/१० | २.७८.७० | २७-८७ |

सदर मिळकत तदंगभुत सर्व हक्कहितसंबंध सुध्दा कायम विकत घेणेचे ठरविले आहे.

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, मृत्युपत्रांकीत दान, साठेकरार, ताबाकब्जा, वहिवाट, पोटगी, लीन, चार्ज, भाडेपट्टा, जाणे येणेचे मार्ग, वारसाहक्क वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदार तर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यांसह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचे आमचे अशिल समजतील. तसेच कोणाचीही हरकत असल्यास ती त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिली आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पत्ता :- ''श्री सद्गुरु कृपा'' १४४ अ,
मु. पो. शेलु, ता. कर्जत, जि. रायगड.
मोबा.नं. ९८६०६२६२४६

**ॲड. संदिप गोपाळ बागडे**
खरेदीदार तर्फे ॲडव्होकेट

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी मौजे सवणे, ता. पनवेल, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत सदर मिळकतीचे मालक/कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मोजे सवणे, ता. पनवेल, जि. रायगड येथील**

| मालक/कब्जेदाराचे नाव | गट क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| अल्पेश तेजस पटेल तेजस मनजी पटेल | १२४ | - | १-०२.०० | ०.४७ |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरीक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कब्जा, एम.ओ. यु. हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधित व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ (एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर करावयात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील अल्पेश तेजस पटेल आणि तेजस मनजी पटेल यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. १९/०९/२०२४.

**श्री. तुषार व देवरे,** ॲडव्होकेट
पत्ता : फ्लॅट नं. ए २, जय नगर को. ऑप हौ. सोसा.लि.
कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६,
जि. रायगड. मोबाईल नं. ९३२५००४००८
tushar.deore82@gmail.com

---

## -: जाहीर नोटीस :-

सर्व लोकांस ह्या जाहीर नोटीसीने कळवण्यांत येते की, खाली नमुद केलेल्या शेत जमीन मिळकती ह्या खाली लिहीलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असून, ती त्यांचे खुद्द, ताबा, कबजा, मालकी, वहीवाटीतील आहे, त्या शेत जमीन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मौजे : भालगांव, ता. रोहा, जि.रायगड येथील:-**

| मालकाचे नांव | गट/भुमापन क्र. | एकूण क्षेत्र : हे.आर. | आकार रू. पै. | भोगवटा वर्ग |
|---|---|---|---|---|
| निरा नथुराम शिंदे व इतर - ७ | २५३ | ०-२१-३० | ३=६३ | १-खालसा / भात |
| गणपत सिताराम हर्डीकर व इतर-६ | २५४ | ०-३१-७० | ०=५० | १-खालसा/ गवतपड |

वरील मिळकतींसंबंधात आमचे अशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे, यास्तव वरील मिळकतींवर अन्य कोणाचा दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिएन, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, कुळवहीवाट, ताबा, कबजा, वहीवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, जप्ती, मॉर्टगेज, संपादन, रिझर्व्हेशन, रेक्वीझेशन अगर अन्य प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध तसेच एकत्र कुटूंब मिळकत असल्याने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रत्यक्ष भेटून मुदतीमध्ये हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात, तशा प्रकारच्या हरकती मुदतीत दाखल न केल्या गेल्यास सदरच्या वरील मिळकती पुर्णपणे निर्वेध असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल वरील जमीन मालकांशी खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

हे कळावे,

दि. /०९/२०२४

**ॲड. सागर हिराकांत भगत,**
ॲडव्होकेट,
पत्ता : मौजे-उन्हेरे-कुंभारशेत, पो. पाली,
ता. सुधागड, जि. रायगड
मोबा.क्र.८९८३४५६८४७

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे-लाडीवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालक | सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र हे.आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| अशोककुमार जगदीश गुप्ता | १२/१/क | ०-८८-६० यापैकी क्षेत्र ०-४०-६० हे आर पॉ एवढे क्षेत्र | ३-८७ |
| अशोक कुमार गुप्ता | १६/३/अ | ०-०९-०० | ०-९४ |
| अशोक कुमार गुप्ता जोसेफ एम बि मेस्करेनस | १५/२ | ०-४५-५० | ७-७५ |
| अशोक कुमार गुप्ता जोसेफ एम बि मेस्करेनस | १६/३/ब | ०-०७-६० | ०-९४ |
| अशोक कुमार गुप्ता जोसेफ एम बि मेस्केरेनस | १४/२ | ०-३५-९० | ६-१२ |
| अशोक कुमार गुप्ता | १५/३/ब | ०-३७-६० यापैकी रस्त्याच्या वहिवाटीसाठी दिलेले क्षेत्र ०-०३-०० हे आर पॉ | ५-०० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ११ (अकरा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १९/०९/२०२४

**ॲड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता - शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर,
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

---

## जाहिर सुचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमुद केलेले त्यांचे मालकांचे नांव या कॉलममध्ये नमूद केलेले मिळकतीचे मालकांकडून त्यांचे नावासमोरील कॉलममध्ये नमूद केलेली त्यांचे मालकीची खुद्द, ताबा, कब्जा, वहिवाटीतील जमीन मिळकत आमचे अशिलांनी कायम खुष खरेदी घेणेबाबत व्यवहार ठरवीला आहे. सदर मिळकत ही निर्वेध असल्याचा हवाला जमीन मालकांनी आमचे अशिलांस दिला आहे, त्या जमीन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**पत्ता- मौजे दुरटोली, ता. रोहा, जि. रायगड**

| मालकाचे नांव | गट नं. | क्षेत्र: आर् | आकार: रू. पै. |
|---|---|---|---|
| मंगेश श्रीकांत सरफळे | ४८५/१/अ | १-४१-०० | ०=६३ |

(यापैकी मंगेश श्रीकांत सरफळे यांचे मालकी व वहिवाटीचे स्वतंत्र क्षेत्र ०-३०-०० हे. आर आकार ०.१३ रू. पै. करता मात्र )

तरी सदरचे मिळकतींवर कोणाचा कोणताही दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, लिज, लिएन, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, कुळवहिवाट, ताबा, कबजा, वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, जप्ती, मॉर्टगेज, संपादन, रिझर्व्हेशन, रिक्वीझेशन अगर अन्य प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खालील सही करणारे ॲडव्होकेट यांजकडे लेखी रजिस्टर पोस्टाने हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात, तशा प्रकारच्या हरकती दाखल न केल्या गेल्यास सदरची वरील मिळकत ही पूर्णपणे निर्वेध असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल रजिस्टर्ड खरेदीखताने सदरच्या मिळकती कायम खुष खरेदी घेतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे कळावे,

दि. १७/०९/२०२४

**ॲड. समीर पांडुरंग सानप**
ऑफिस वर्धमान दर्शन इमारत,
रोहा - कोलाड रोड, भुवनेश्वर, ता.रोहा
मो. ९७६७२५३११२/७७७६८१९६३७

---

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे पक्षकार सौ.ऋषिका प्रविण मोहिते रा.प्लॉट नंबर ४२९, म्हाडा कॉलनी पेण, ता.पेण.जि.रायगड यांनी दिलेल्या माहितीनुसार व सांगितल्याप्रमाणे

आमच्या पक्षकारांच्या मालकीच्या असलेल्या जिल्हा-रायगड, ता.पेण, नगरपालिका परिषद हद्दीतील सर्व्हे नं. २५२ ए मध्ये म्हाडा (महाराष्ट्र हौसिंग एरिया डेव्हलपमेंट असोसिटी) यांनी विकसित केलेल्या भुखंडापैकी भुखंड नं. ४२९, ज्याचे क्षेत्रफळ ५०.०० चौ. मीटर ही मिळकत म्हाडा कडून श्रीमती. विभावरी रामचंद्र साळवी यांनी म्हाडाकडून भाडेपट्टा दस्ताद्वारे घेतलेली आहे त्याचा दस्त नं.प ए न ३८०/२००३ असा आहे. त्यानंतर श्रीमती. विभावरी रामचंद्र साळवी यांच्याकडून आत्ताचे मालक सौ. ऋषिका प्रविण मोहिते यांनी ॲग्रीमेंट टू सेल या नोंदणीकृत दस्ताद्वारे घेतलेले आहे.

आमचे पक्षकार सौ. ऋषिका प्रविण मोहिते यांचे पती श्री.प्रविण मारूती मोहिते यांस श्रीमती. विभावरी रामचंद्र साळवी यांनी नोंदणीकृत दस्त नं. प ए न ३८०/२००३ या दस्ताची मुळ प्रत दिलेली आहे. परंतु श्री.प्रविण मारूती मोहिते यांच्याकडून नोंदणीकृत दस्त नं. प ए न ३८०/२००३ हा दस्त पेण बाजारपेठेत प्रवास करत असताना गहाळ झालेले आहे. त्या बाबत पोलिस स्टेशन पेण येथे दस्त गहाळ झाल्याबाबत दिनांक ०२/०९/२०२४ रोजी तक्रार दाखल करण्यात आलेली आहे त्याचा तक्रार नं. ०२८ असा आहे.

तरी सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर नोंदणीकृत दस्त नं. प ए न ३८०/२००३ ची मुळ प्रत सापडल्यास अथवा त्या बाबत कोणतीही तक्रार, हरकत असल्यास, सदरची प्रत सापडल्यास खालील ॲडव्होकेट यांचे कडे ०७ दिवसांच्या मुदतीत लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे पक्षकार सदर मिळकतीच्या बाबतीत योग्य तो निर्णय घेतील. मुदतीनंतर येणारी हरकत आमच्या पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही.

दि.१९/०९/२०२४

सही/-
**ॲड.जितेंद्र द.म्हात्रे**
बी.ए.एल.एल.एम.
नोटरी (भारत सरकार)
कार्या.समर्थ प्रसाद नगर, डी विंग ४, राजू पोटे मार्ग,
ता.पेण, जि.रायगड, फोन नं. ९४२२०९४७७४

---

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


---

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. भोलेनाथ भिवा निघुकर व श्री. बाळाराम भिवा निघुकर, रा. खार्डी गाव, पो. डावळे, दिवा शिळ रोड, टी. एम. सी. शाळे जवळ, ठाणे, ४००६१२, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

मिळकतीचे वर्णन : मौजे बलिवरे, ता.कर्जत, जि.रायगड, येथील जमिन मिळकत.

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू. पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ३१/१/अ | ३.५९.०० पो.ख.०.३५.०० | २.६२ | श्रीमती मंदाकिनी देवजीराव गोडाणे व श्रीमती विदीशी देवजीराव गोडाणे |
| | एकुण ३.९४.०० | | |

यापैकी श्रीमती मंदाकिनी देवजीराव गोडाणे व श्रीमती विदीशी देवजीराव गोडाणे यांच्या नावे असलेल्या १.९७.०० हे.आर.पॉ. या क्षेत्रापैकी श्रीमती विदीशी देवजीराव गोडाणे यांच्या हिश्श्याचे ०.९८.५० हे.आर.पॉ. क्षेत्र.

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून होणाऱ्या ११ (अकरा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विकीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- १९/०९/२०२४.

सही/-
**ॲड. उषा जे. कांबळे**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे
मो.नं.७३८५००४८०६

---

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. राजेंद्र महादेव बोडके, रा. राज महेल बंगला, रूम नं. ३१६-२, सरकारी हॉस्पिटल जवळ, कर्जत, विठ्ठल नगर, ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे सावळे, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ८/१ | ०.३१.०० | ०.२२ | श्रीमती निलम काळूराम भोईर व श्रीमती नीता हरिश्चंद्र भोईर |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- १९/०९/२०२४

सही /-
**ॲड.उषा जे. कांबळे.**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे .
मो. नं. ७३८५००४८०६

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे हालिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालक श्री विलास बबन चंदन यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| २५ | ४ | ०-०६-६० | ०-०९ |
| २७ | १/५ | ०-२३-८० | २-०६ |
| ३१ | १/ब | ०-१०-४० | ०-५९ |

सबब सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, लिज, लिन, बक्षीस, करार, ताबेकब्जा, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि. १९/०९/२०२४.

**ॲड.सतीश धर्मा डायरे,**
पत्ता- ००२, शिवतीर्थ, सहयोग
को.ऑ.हौ.सो.ब्राम्हण आळी,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
मो.९८५०४०२६५७.

# भारतीय हॉकी संघाने ड्रॅगनला हरवले

## आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचं विक्रमी पाचवं जेतेपद

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताच्या हॉकी संघाने चीनचा पराभव करत आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीचे जेतेपद पटकावले आहे. भारतीय संघ पाचव्यांदा आशियाई ट्रॉफी पटकावण्यात यशस्वी ठरला आहे.

चौथ्या क्वार्टरमध्ये भारताकडून जुगराज सिंगने एक गोल करत भारताला आघाडी मिळवून दिली. चीनने अखेरच्या सेकंदापर्यंत गोल करण्याचा प्रयत्न केला पण भारतीय खेळाडूंनी कडवी झुंज देत विजय आपल्या नावे केला. चीनने पहिल्यांदाच आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला होता. तर पाकिस्तानच्या संघाने दक्षिण कोरियाचा पराभव करत तिसरे स्थान मिळवले.



भारतीय हॉकी संघाने लागोपाठ दोन वेळा आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचे जेतेपद पटकावले आहे. याआधी उपांत्य फेरीत भारतीय हॉकी संघाने कोरियाचा ४-१ असा पराभव केला होता. उपांत्य फेरीत कोरियन संघाविरुद्ध हरमनप्रीत सिंग, उत्तम सिंग आणि जर्मनप्रीत सिंग यांनी गोल केले. कर्णधार हरमनप्रीतने एकूण दोन गोल केले होते. हरमनप्रीत सिंगने संपूर्ण टूर्नामेंटमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली. यासाठी हरमनप्रीतला प्लेअर ऑफ द टूर्नामेंटचा किताबही मिळाला.

पहिल्या क्वार्टरमध्ये दोन्ही संघातील एकाही खेळाडूला गोल करण्यात अपयश आले. भारताने गोल करण्याच्या संधी निर्माण केल्या. मात्र, गोल करण्यात संघाला यश आले नाही. भारताला पेनल्टी कॉर्नरही मिळाला. पण त्याचा फायदा भारतीय हॉकी संघाला करता आला नाही. दुसऱ्या क्वार्टरमध्येही दोन्ही संघांकडून एकही गोल झाला नाही. या क्वार्टरमध्ये चीनच्या बचावफळीने चांगली कामगिरी करत भारतीय खेळाडूंना रोखून धरले. तिसऱ्या क्वार्टरमध्ये चीनने गोल करण्यासाठी अनेक हल्ले केले. पण त्यापैकी एकही गोल भारतीय गोलरक्षक कृष्णा पाठकपर्यंत पोहोचू शकला नाही.

जुगराज सिंहचा जबरदस्त गोल तिसऱ्या क्वार्टरपर्यंत दोन्ही संघाकडून एकही गोल झाला नाही. अशा स्थितीत पेनल्टी शूटआऊटपर्यंत सामना जाईल असे चित्र होते. यानंतर जुगराज सिंगने उत्कृष्ट मैदानी गोल करत संघाला सामन्यात १-० अशी आघाडी मिळवून दिली. त्यामुळे भारतीय हॉकी संघाच्या विजयाच्या आशा वाढल्या. यानंतर भारताने चीनला गोल करण्याची एकही संधी दिली नाही. अंतिम फेरीतील जुगराजचा गोल संघासाठी ट्रॉफी जिंकण्यात महत्त्वाचा ठरला. भारतीय हॉकी संघाने आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी २०२४ मध्ये आश्चर्यकारक कामगिरी केली आहे आणि अंतिम फेरीपर्यंत एकही सामना गमावलेला नाही.

यंदाच्या टूर्नामेंटमध्ये अपराजित राहिलेल्या भारतीय हॉकी संघाने पाचव्यांदा आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीचे विजेतेपद पटकावले आहे. यापूर्वी, भारताने २०११, २०१६, २०१८ (पाकिस्तानसह संयुक्त विजेते) आणि २०२३ मध्ये देखील भारतीय संघाने ट्रॉफी जिंकली होती.

# अर्जुनने टिपले सामन्यात ९ बळी

## ■ गोव्याला विजय मिळवून देण्यात मोठा वाटा

**। कर्नाटक । वृत्तसंस्था ।**

अर्जुन तेंडुलकरने गोवा क्रिकेट असोसिएशनकडून खेळताना सामन्यात एकूण ९ विकेट घेतल्या. पहिल्या डावात त्याने पाच तर दुसऱ्या डावात अर्जुनने चार विकेट घेतल्या. अर्जुन हा एक वेगवान गोलंदाज असून त्याच्या गोलंदाजीमुळे तो पुन्हा एकदा चर्चेत आला. डावखुरा वेगवान गोलंदाज सध्या कर्नाटकात सुरू असलेल्या डॉक्टर के थिमप्पिया मेमोरियल स्पर्धेत खेळत आहे. जिथे त्याने गोव्याकडून खेळताना कर्नाटक संघाविरुद्ध भेदक गोलंदाजी केली. या रेड बॉल स्पर्धेत अर्जुनने शानदार गोलंदाजी करत गोव्याला एक डाव आणि १८९ धावांनी विजय मिळवून देण्यात मोठी भूमिका बजावली. आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सकडून पदार्पण करणाऱ्या अर्जुनच्या भेदक गोलंदाजीसमोर प्रतिस्पर्धी संघाचे खेळाडू फेल ठरले. अर्जुन तेंडुलकरने केएससीए इलेव्हनच्या फलंदाजांना फार काळ मैदानात टिकू दिले नाही. या डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाने पहिल्या डावात केवळ ४१ धावा देत ५ विकेट्स घेतल्या.



केएससीए इलेव्हन संघाला पहिल्या डावात केवळ १०३ धावा करता आल्या. प्रत्युत्तरात गोवा क्रिकेट असोसिएशन संघाने पहिल्या डावात ४१३ धावांची मोठी मजल मारली. अभिनव तेजरानाने १०९ धावांची खेळी केली. मंथन खुटकरने ६९ धावांची खेळी केली तर अर्जुन तेंडुलकरने १८ धावांचे योगदान दिले.

दुसऱ्या डावात अर्जुन तेंडुलकरने पुन्हा आपल्या भेदक गोलंदाजीने प्रतिस्पर्धी खेळाडूंना गुढघे टेकायला भाग पाडले.

# नीरज चोप्राच्या हातावर यशस्वी शस्त्रक्रिया

**। स्वित्झर्लंड । वृत्तसंस्था ।**

भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्राने १४ सप्टेंबरच्या रात्री डायमंड लीग फायनलमध्ये दुखापतग्रस्त हाताने दुसरे स्थान पटकावण्याचा पराक्रम केला. त्याला डायमंड ट्रॉफी जिंकता आली नाही. हाताला झालेली दुखापत हेच त्यामागचे कारण होते. नीरज चोप्राच्या हातावर सोमवारी (१६ सप्टेंबर) स्वित्झर्लंडमध्ये यशस्वी शस्त्रक्रिया पार पडली.

१५ सप्टेंबरला डायमंड लीगच्या फायनलनंतर नीरजने स्वतः सोशल मीडिया पोस्टद्वारे त्याच्या दुखावलेल्या हाताबाबत खुलासा केला होता. २०२४ चा सीझन संपत असताना, मी वर्षभरात शिकलेल्या सर्व गोष्टी लक्षात ठेवत आहे. त्यात सुधारणा, अपयश, मानसिकता आणि बरेच कंगोरे आहेत.

## ■ स्वित्झर्लंडमध्ये झाले उपचार



सोमवारी (९ सप्टेंबर) मला सरावाच्या वेळी दुखापत झाली आणि माझ्या डाव्या हाताचे चौथे मेटाकार्पल हाड फ्रॅक्चर झाल्याचे समजले. डॉक्टरांच्या मदतीने ब्रुसेल्समध्ये डायमंड लीग फायनल्स खेळला. मात्र, विजेतेपदापासून तो वंचित राहिला आणि त्याला दुसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले होते. आता त्याचा हात बरा आहे.

# सुनील गावस्करांनी दिला भारतीय संघाला इशारा

## बेसावध राहिल्यास पाकिस्तानसारखी स्थिती होईल

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

भारताचे माजी खेळाडू सुनील गावस्कर यांनी भारतीय संघाला बांगलादेशविरुद्धची कसोटी मालिका आणि जागतिक कसोटी चॅम्पियनशिप बाबत इशारा दिला आहे. भारतीय संघ बेसावध राहील्यास पाकिस्तानच्या संघासारखी स्थिती होऊ शकते, असे ते म्हणाले आहेत.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने १९ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या बांगलादेशविरुद्धच्या कसोटी मालिकेपूर्वी दुलीप ट्रॉफीचे आयोजन करणे सुनील गावस्कर यांनी सकारात्मक असल्याचे म्हटले आहे. भारतीय संघ पुढील साडेचार महिन्यात १० कसोटी सामने खेळणार आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलबाबत गावस्कर म्हणाले की, भारताला किमान ५५ सामने जिंकावे लागतील आणि ते सोपे नसेल.

दुलीप ट्रॉफीमध्ये भारतीय संघाचे गोलंदाज खेळायला हवे होते, असे सुनील गावस्कर यांनी मिड-डेमधील स्तंभात लिहिले आहे. कारण सेकंड स्ट्रिंग गोलंदाजांविरुद्ध कोण चांगला फलंदाज आहे हे शोधणे फार कठीण आहे. कारण सर्वोत्तम फलंदाज कोण हे निवडकर्त्यांना कळणार नाही. जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, रविचंद्रन अश्विन आणि रवींद्र जडेजा दुलीप ट्रॉफीमध्ये खेळले नाहीत हे लक्षात ठेवा. सिराज आणि जडेजा यांना नंतर संघातून रिलीज करण्यात आले. तर अश्विन आणि बुमराह यांची निवड केली नाही. मोहम्मद शमीदुखापतीतून सावरत आहे.

सुनील गावस्कर पुढे म्हणाले,



बांगलादेशविरुद्ध कसोटी मालिका सुरू होण्यापूर्वी दुलीप ट्रॉफीचे आयोजन करणे हे बीसीसीआयने उचललेले सर्वोत्तम पाऊल आहे. सर्वोत्कृष्ट खेळाडूंसाठी तयारी शिवाय आंतरराष्ट्रीय स्पर्धेला जाणे सोपे नसते, मग विरोधी संघ कोणीही असो. पाकिस्तानमध्ये खेळल्या गेलेल्या दोन्ही कसोटी सामन्यांमध्ये पाकिस्तानला पराभूत करून बांगलादेश संघाने दाखवून दिले आहे की, ते काय करू शकतात. काही वर्षांपूर्वी भारताने बांगलादेशचा दौरा केला तेव्हाही बांगलादेशी खेळाडूंनी त्यांना कडवी टक्कर दिली होती.

सुनील गावस्कर यांनी पुढे लिहिले की, आता पाकिस्तानविरुद्धची मालिका जिंकल्यानंतर ते भारताचा सामना करण्यास तयार आहेत. त्यांच्याकडे काही उत्कृष्ट खेळाडू आणि काही नवीन खेळाडू आहेत. ज्यांना आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये खेळताना विरोधी संघाची भिती वाटत नाही. आता त्यांच्याविरुद्ध खेळणाऱ्या प्रत्येक संघाला हे माहीत आहे की त्यांना साधारण समजू शकत नाही, अन्यथा पाकिस्तानसारखी परिस्थिती होऊ शकते, असा इशारा त्यांनी दिला.



○ ( छायाचित्र - अमोल नाईक )

# तनिष्का पाटीलला शिष्यवृत्ती

## चित्रलेखा पाटील यांनी केले कौतुक

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पेझारी तथा आयएसओ मानांकन प्राप्त डिजिटल आदर्श शाळेची इयत्ता पाचवीतील विद्यार्थिनी तनिष्का विनोद पाटील ही अलिबाग तालुक्यातून एकमेव शिष्यवृत्तीधारक विद्यार्थिनी ठरली आहे.

तनिष्काच्या यशाबद्दल शेकापच्या जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा नृपाल पाटील यांनी तिचे अभिनंदन केले आहे. तसेच, तनिष्का विनोद पाटील हिला चित्रलेखा पाटील यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी विनोद पाटील व तनिष्का पाटील यांचे कुटुंबिय उपस्थित होते.

# परिस्थिती बदलण्यासाठी राजकारणात एन्ट्री

## भारतीय कुस्तीपटू विनेश फोगाटची माहिती

**। हरियाणा । वृत्तसंस्था ।**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पदक गमावल्यानंतर विनेश फोगटने कुस्तीतून निवृत्ती जाहीर केली. भारतात परतल्यावर तिने कुस्तीत परत येण्याचे संकेत दिले होते, पण काही दिवसांनी तिने कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला. आता ती हरियाणा विधानसभा निवडणुकीत जुलाना मतदारसंघातून कॉंग्रेसची उमेदवार आहे. परिस्थिती बदलण्यासाठी राजकारणात आल्याचे विनेशने स्पष्ट केले आहे.

कुस्तीतून निवृत्ती घेतल्यानंतर विनेशला तिचा निर्णय बदलण्याची, एनजीओ उघडण्याचा, कोट्यवधी रुपयांचे प्रायोजकत्व मिळवण्याच्या ऑफर आल्या होत्या, पण तिने राजकारणी होण्याचा निर्णय का घेतला? याबाबत तिने इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना खुलासा केला. पदक गमावल्यापासून



आतापर्यंतचा राजकीय अनुभव कसा आहे? असे विचारल्यावर विनेश फोगट म्हणाली, मी राजकारणात न येण्याचा निर्णय घेतला होता. पण जेव्हा मी या मोठ्या लढ्याचा (निषेध) सामना करत होते, तेव्हा मला जाणवले की परिस्थिती बदलण्यासाठी तुम्हाला राजकारणात यावे लागेल. मी राजकारणात आल्यावर माझ्याबद्दलची लोकांची सद्भावना संपेल, असे काहींनी मला सांगितले होते. विनेश फोगट पुढे म्हणाली, पण तसे झाले नाही. मला एका मुलीसाठी आणि सूनेसाठी लोकांच्या भावना दिसत आहेत. यामध्ये विशेषतः महिलांकडून प्रेम आणि आदर वाढला आहे. त्या मला मिठी मारून आशीर्वाद देत आहेत. राजकारणात येणे हा मोठा निर्णय होता, ही ईश्वराची इच्छा होती. त्यामुळे मी माझ्या नशिबाला अनुसरुन पावले टाकत आहे. पॅरिस ऑलिम्पिक पदक गमावणे की ब्रिजभूषण सिंग सारख्या शक्तिशाली राजकारण्याविरुद्ध तुमचा निषेध, कोणत्या गोष्टीने लोकांच्या मनात स्थान निर्माण केले? यावर विनेश फोगट म्हणाली, मला वाटते निषेध. कारण लोकांना वाटते की, आम्ही जे केले ते त्यांच्या मुली आणि त्यांच्या कुटुंबासाठी केले होते. तसेच ऑलिम्पिकमधील यश ही वैयक्तिक गोष्ट आहे.

कुस्तीपटू पुढे म्हणाली, जेव्हा आपण इतरांसाठी काही करतो, तेव्हा लोक तुमच्यावर प्रेमाचा वर्षाव करतात. मला इतक्या प्रेमाची आणि पाठिंब्याची अपेक्षा नव्हती. आम्ही आंदोलन करत होतो. पण ते शेतकरी आंदोलनासारखे जनआंदोलन ठरु शकले नाही, जिथे एका मोठ्या गटाने दोन वर्षे आंदोलन केले होते. आमचा लढा हा प्रत्येकाचा लढा नव्हता हे लक्षात आले. लोकांना नोकरी, वैयक्तिक बाबी हाताळाव्या लागतात, असे ती म्हणाली.

# पाकिस्तानी चाहत्यांमध्ये विराट कोहलीची क्रेझ

## किंग कोहलीची जर्सी स्टेडियममध्ये झळकली

**। लाहोर । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तान क्रिकेट संघ सध्या खराब कामगिरीमुळे चर्चेचा विषय आहे. सध्या पाकिस्तानमध्ये चॅम्पियन्स वनडे कप खेळवला जात आहे. १२ सप्टेंबरपासून सुरू झालेल्यापाकिस्तानच्यायादेशांतर्गत स्पर्धेत माजी कर्णधार बाबर आझमसह अनेक वरिष्ठ खेळाडू खेळत आहेत. फैसलाबादच्या इक्बाल स्टेडियमवर रविवारी झालेल्या सामन्यादरम्यान



पाकिस्तानी चाहत्यांमध्ये भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीची क्रेझ पाहायला मिळाली. एक चाहता किंग कोहलीची जर्सी घेऊन स्टेडियममध्ये पोहोचला.

या चाहत्याचा फोटो, व्हीडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. व्हायरल झालेल्या फोटोमध्ये या जर्सीच्या मागच्या बाजूला विराटचे नाव आणि जर्सी नंबर लिहिलेला दिसत आहे. स्टॅलियन्स आणि मार्कोस यांच्यातील स्पर्धेच्या चौथ्या सामन्या दरम्यान, कोहलीचा हा चाहता कोहलीची जर्सी दाखवत होता आणि तितक्यात कॅमेरामनने ती जर्सी आपल्या कॅमेऱ्यात कैद केली.

# बांगलादेशच्या संघाला विरोधानंतर स्पेशल प्रोटोकॉल

**। चेन्नई । वृत्तसंस्था ।**

बांगलादेशच्या संघाला भारतामध्ये जोरदार विरोध होताना दिसत आहे. बांगलादेशमध्ये हिंदू धर्मीयांवर अत्याचार होत असताना त्यांच्या संघाबरोबर कसोटी मालिका का खेळायची, असा सवाल काही चाहत्यांनी बीसीसीआयला विचारला आहे. कानपूर कसोटी सामना रद्द करण्याची धमकीही हिंदू महासभेने दिली आहे. त्यामुळे आता बांगलादेशच्या संघासाठी खास प्रोटोकॉल आणला आहे. याबाबत आयसीसीचे अध्यक्ष आणि बीसीसीआयचे सचिव जय शहा यांनी माहिती दिली.

भारत आणि बांगलादेश यांच्यातील पहिला कसोटी सामना हा १९ सप्टेंबरपासून चेन्नई येथे होणार आहे. त्यानंतर दुसरा आणि मालिकेतील अखेरचा सामना हा कानपूर येथे होणार आहे. बांगलादेशचा संघ हा प्रथम चेन्नईत दाखल झाला. चेन्नईत कडेकोट बंदोबस्तात बांगलादेश संघाचे आगमन झाले. त्यांना संरक्षण दिले आहे.



● श्री. सोमनाथ थळे-खाप्रेकर परिवार, मु. कोळगाव, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना सासवणे ग्रामपंचायत सदस्या संजना पाटील (छायाचित्र- अब्दुल सोगावकर)

## विजेत्या संघाला मिळणार तबबल २.३५ मिलियन डॉलर

# महिला टी-20 विश्वचषक बक्षिसांच्या रकमेत वाढ

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

महिला टी-२० विश्वचषक २०२४ ला २९ सप्टेंबरपासून सुरूवात होत आहे. आयसीसीने २०२४ च्या महिला विश्वचषकाच्या यजमानपदाची जबाबदारी युएईला दिली आहे. पहिला सामना ३ ऑक्टोबरला शारजाह क्रिकेट स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. मात्र, यादरम्यान आयसीसीने एक मोठी घोषणा केली आहे. आयसीसीने चॅम्पियन संघ आणि उपविजेता संघाला किती बक्षिस रक्कम मिळणार हे जाहीर केले आहे. आयसीसीने २०२४ च्या टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या बक्षीस रकमेत मागील विश्वचषकाच्या तुलनेत वाढ केली आहे.

आयसीसीने २०२४ महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेची बक्षीस रक्कम ७९,५८,०८० डॉलर्सपर्यंत वाढवली आहे, जी गतवर्षीच्या विश्वचषकाच्या तुलनेत दुप्पट आहे. महिला टी-२० विश्वचषक २०२४ च्या विजेत्याला तब्बल २.३५ मिलियन डॉलर



मिळतील, जे २०२३ मध्ये चॅम्पियन ऑस्ट्रेलियाला दिलेल्या १ मिलियन डॉलरपेक्षा १३४ टक्क्यांनी अधिक आहेत. उपविजेत्या संघावरही पैशांचा वर्षाव होणार आहे. उपविजेत्या संघाची बक्षीस रक्कमही गेल्या विश्वचषकाच्या तुलनेत वाढली आहे. यंदा विजयी होणाऱ्या संघाला १.१७ मिलियन डॉलर रक्कम दिली जाईल. उपांत्य फेरीत पोहोचणाऱ्या संघाला ६,७५,००० डॉलर इतकी रक्कम मिळेल. तर गट सामने जिंकणाऱ्या संघाला ३१,१५४ डॉलर्स इतकी रक्कम मिळेल. यंदा महिला टी-२० विश्वचषक २०२४ मध्ये १० संघ सहभागी होत आहेत.

प्रत्येकी ५ संघांना दोन गटांत विभागण्यात आले आहे. अ गटात भारत, पाकिस्तान, श्रीलंका, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडचे महिला संघ आहेत. तर ब गटात बांगलादेश, दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, स्कॉटलंड आणि वेस्ट इंडिज या महिला संघांचा समावेश आहे. गट टप्प्यातील शेवटचा सामना १५ ऑक्टोबर रोजी खेळवला जाईल, तर दोन्ही गटातील टॉप-२ संघ थेट उपांत्य फेरीसाठी आपले स्थान निश्चित करतील. उपांत्य फेरीचे सामने १७ आणि १८ ऑक्टोबर रोजी शारजाहच्या मैदानावर खेळवले जातील, तर स्पर्धेचा अंतिम सामना २० ऑक्टोबर रोजी खेळवला जाईल.



● मांडवा पोलीस ठाण्यात विराजमान गणरायाचे दर्शन घेताना सासवणे ग्रामपंचायत सदस्या संजना पाटील व इतर महिला दक्षता कमिटी सदस्या (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)